**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २४४ वी बैठक**

| | |
|---|---|
| **दिनांक :** | **१२ जानेवारी, २०१५ (सोमवार)** |
| **वेळ :** | **दुपारी ४.०० वाजता** |
| **स्थळ :** | **मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>सहावा मजला, मंत्रालय<br>मुंबई - ४०० ०३२.** |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. स्वाधीन क्षत्रिय<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. द. म. सुकथनकर | - | सदस्य |
| श्री. ना. वि. मेराणी | - | सदस्य |
| श्री. नितीन करीर<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री. सतिश गवई<br>प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण विभाग | - | सदस्य |
| श्री. संजय भाटिया<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको, मुंबई | - | सदस्य |
| श्री. सीताराम कुंटे<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री. यु.पी.एस. मदान<br>महानगर आयुक्त,<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री. संजय सेठी
अति.महानगर आयुक्त (१)/प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. वेणूगोपाल रेड्डी
अति.महानगर आयुक्त (२),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती अश्विनी भिडे
अति.महानगर आयुक्त (३) व
व्यवस्थापकीय संचालक,
मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन

श्री. पी. आर. के. मूर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती उमा अडुसुमिली
प्रमुख, नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. डी. संपतकुमार
प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. सु. ल. पिंपळखुटे
वित्त सल्लागार, वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. श. म. सबनीस
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. स. भ. तामसेकर
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. वि. ग. पाटील
प्रमुख, सामाजिक विकास कक्ष,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. अ. रा. वानखेडे
उप महानगर आयुक्त (भूमी / मिळकत)
भूमी शाखा, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. दि. न. कवठकर
सह प्रकल्प संचालक (जनसंपर्क) आणि
उप महानगर आयुक्त (प्रशासन) (अति.कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. एस. सी. देशपांडे
सह-प्रकल्प संचालक (नगर नियोजन),
माहिती व तंत्रज्ञान कक्ष,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. रा. म. गोटाफोडे
मुख्य लेखा अधिकारी, वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय नानावटे
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, कार्यकारी समितीच्या वतीने मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे महानगर आयुक्त यांनी स्वागत केले.

त्यानंतर, श्री. नितिन करीर, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग व श्री. सतिश गवई, प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांचे कार्यकारी समितीचे नवे 'पदसिध्द सदस्य' म्हणून महानगर आयुक्त यांनी स्वागत व अभिनंदन केले.

त्यानंतर, श्री. मनुकुमार श्रीवास्तव, माजी प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग व श्री.देबाशिष चक्रबर्ती, माजी प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांनी कार्यकारी समितीचे 'पदसिध्द सदस्य' म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा महानगर आयुक्त यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. तसेच श्री. श्रीकांत सिंह, माजी प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग व श्रीमती मेधा गाडगीळ, माजी अपर मुख्य सचिव, पर्यावरण विभाग यांनी कार्यकारी समितीचे ''पदसिध्द निमंत्रित'' म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचाही गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १६ ऑगस्ट, २०१४ रोजी झालेल्या २४३व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

१.१ कार्यवृत्तावर चर्चा करताना कार्यकारी समितीचे तज्ञ सदस्य श्री. ना.वि.मेराणी यांनी कार्यवृत्तातील बाब क्र.४ मधील परिच्छेद क्र.४.८ मध्ये काही मुद्दे नमूद करण्याची विनंती केली व त्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली. त्यानुसार परिच्छेद क्र.४.८ मध्ये **प्राधिकरणाव्दारे भविष्यात जनसंपर्क संस्थेची नियुक्ती करताना सदर संस्थेला देय होणा-या मासिक फीमध्ये किफायतशीरपणा असणे, तज्ञांची मते, दुस-या आस्थापनांनी देय केलेल्या फीचे प्रमाण इत्यादी बाबी अंतर्भूत करण्यात याव्यात.** याची नोंद घेण्यात आली. तसेच करारनाम्यामध्ये अंशतः बदल करण्यात आल्याचे निदर्शनास आणण्यात आले.

१.२ उपरोक्त दुरुस्तीनंतर कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**<u>बाब क्र.२ :</u>** **<u>प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १६ ऑगस्ट, २०१४ रोजी झालेल्या २४३व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.</u>**

२.२ कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**<u>बाब क्र.३ :</u>** **<u>मुंबई मेट्रो प्रकल्प वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर :- तिकीट दर वादावर न्यायालयात शासन / मुं.म.प्र.वि.प्राधिकरणातर्फे युक्तीवाद करण्याकरिता मेसर्स खैतान आणि कंपनी यांच्या विधी सल्लागार म्हणून नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.</u>**

३.१ या विषयावर माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मेट्रो रेल्वे प्रकल्प (मेट्रो मार्ग-१) सार्वजनिक-खाजगी सहभागाव्दारे बांधा, स्वामित्व घ्या, वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्वावर राबविण्यात आला आहे. मे.रिलायन्स एनर्जी लि., व्होओलिया ट्रान्सपोर्ट (फ्रान्स) व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा समावेश असलेले विशेष उद्दिष्ट वाहन (SPV) म्हणून मुंबई मेट्रो वन प्रा.लि. या नावाने दिनांक २२ डिसेंबर, २००६ रोजी स्थापन करण्यात आले. मुंबई मेट्रो वन प्रा. लि. या संस्थेच्या दिनांक २९ मे, २०१४ रोजी झालेल्या ४२ व्या बैठकीत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि महाराष्ट्र शासन यांच्या सदस्यांनी प्रस्तावित वाढीव दराबाबतचा ठराव संमत करण्याबद्दल तीव्र आक्षेप घेऊन देखील मुंबई मेट्रो वन प्रा. लि.च्या संचालक मंडळाने शासनाने अधिसूचित केलेल्या रुपये ९, ११ आणि १३च्या विरोधात मेट्रो भाडे दर वाढवून रुपये १०, २०, ३० आणि ४० करण्याबाबत ठराव संमत केला.

३.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, मुंबई मेट्रो वन प्रा. लि. कडून भाडे वाढवण्याबद्दलचे प्रस्ताव प्राप्त झाल्यावर या विषयावर मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांच्या समवेत चर्चा करण्यात आली होती. या चर्चेत ठरविण्यात आले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने काही नामांकित विधी कंपन्याकडून कायदेशीर सल्ला घेऊन उपलब्ध असलेल्या सर्व पर्यायामार्फत भाडे वाढीस विरोध दर्शवावा. त्यानुसार मे.अमरचंद मंगलदास, AZB आणि मे. खैतान आणि कंपनी या सारख्या नामांकित विधी कंपन्यासमवेत संपर्क साधण्यात आला. परंतू पहिल्या दोन कंपन्यांनी त्यापूर्वी मे. रिलाईन्स यांना कायदेशीर सल्ला दिला असल्यामुळे व परस्पर विरोध स्वारस्यामुळे (Conflict of Interest) प्राधिकरणास सल्ला देण्यास असमर्थता दर्शविली. त्यामुळे मे.खैतान आणि कंपनीला तातडीने संपूर्ण प्रकरणात सल्ला देण्याकरीता नियुक्त करण्यात आले. मुंबई मेट्रो वन प्रा. लि. या कंपनीने प्राधिकरणातर्फे विरोध दाखवून ही सदर भाडेवाढीचा ठराव संमत केल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयात मे.खैतान आणि कंपनी मार्फत याचिका दाखल करण्यात आली. उच्च

न्यायालयात प्राधिकरणाची बाजू मांडण्याकरिता वरिष्ठ conunsel ची नेमणूक मे.खैतान आणि कंपनी व्दारे करण्यात आली. या प्रकरणी न्यायालयात ५-६ सुनावण्या झाल्या असून आतापर्यंत मे.खैतान आणि कंपनी यांना त्यांनी केलेल्या कामाप्रमाणे रु.४९,९९,२०१/- इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे.

३.३ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, या प्रकरणी न्यायालयीन कामकाजासाठी विधी सल्लागार म्हणून मे.खैतान ॲण्ड कंपनी यांची नियुक्ती करण्यासाठी कार्योत्तर मंजूरी देण्याचे प्रस्तावित आहे. तसेच आतापर्यंत रु.४९,९९,२०१/- इतके मागील देयक अदा करण्यास कार्योत्तर मंजूरी तसेच पुढील प्रस्तावित युक्तीवादाच्या सुनावणीकरिता बाब टिप्पणीमध्ये दिलेल्या दरानुसार देयके अदा करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला.

३.४ श्री. द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, मा. उच्च न्यायालयाचे आदेश असताना दरवाढीबाबत समिती स्थापन का करण्यात आली नाही? त्यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर समिती केंद्र सरकारमार्फत स्थापन करणे आवश्यक होते. त्यानुसार सदर समितीची स्थापना दिनांक ३१ जानेवारी, २०१५ पर्यंत होणे अपेक्षित आहे.

३.५ श्री. ना. वि.मेराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, वकीलाची फी प्रत्येक तासाला आकारली जाते का? व त्याचा हिशेब कोण ठेवत आहे? त्यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वकीलाची फी तासांवर आकारली जात असून त्यांच्या हिशेबाप्रमाणे कंपनीकडून देयके सादर करण्यात येतात. त्यामुळे ती योग्य आहेत असे समजून प्राधिकरण त्याला मंजूरी देते.

३.६ श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी पुढे अशी विचारणा केली की, मे.खैतान आणि कंपनी यांची सेवा पुढे चालू ठेवणे गरजेचे आहे काय? त्यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, भाडेवाढ संदर्भात पुढील युक्तीवाद घेणे किंवा गरज भासल्यास सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करणे गरजेचे असल्यामुळे पुढील न्यायालयीन कारवाईकरिता प्राधिकरणास मे.खैतान व कंपनी यांची गरज लागणार आहे.

**निर्णय : त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने खालील ठराव मंजुर केला :-**

**ठराव क्र. १२६५:**

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि

त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प, वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या मेट्रो मार्गावरील तिकिट दरासंबंधी न्यायालयीन कामकाजासाठी विधी सल्लागार म्हणून मे. खेतान अँण्ड कंपनी यांना बाब टिप्पणीतील मुद्दा क्र.८ मध्ये नमूद केलेले देयक देण्यास कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**“असाही ठराव करण्यात येत आहे की,** आतापर्यंत रु.४९,९९,२०१/- इतके मागील देयक अदा करण्यास कार्योत्तर मंजूरी तसेच पुढील प्रस्तावित युक्तीवादाच्या सुनावणीकरीता ठरविलेल्या दरानुसार देयके अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**“आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**बाब क्र.४ : ठाणे रेल्वे स्थानक ते विटावा (कळवा) या दरम्यान आकाशमार्गिका (Skywalk) बांधणेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (Project Management Consultant) नेमणे.**

४.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, दिनांक २७ जून, २०१४ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १३४ व्या बैठकीमध्ये ठाणे ते विटावा या आकाशमार्गिकेच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. सदर कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करण्यासाठी वृत्तपत्रात जाहिरात देण्यात आली होती. त्यास प्रतिसाद म्हणून ई-निविदा भरलेल्या ७ निविदाकारांपैकी ६ निविदाकार विहित अर्हता व अटींची पूर्तता करु शकले. तांत्रिक व आर्थिक प्रस्तावास अनुसरुन निविदेतील तरतूदींप्रमाणे तांत्रिक निकष ८०% भार आणि आर्थिक निकष २०% भार हया गृहिकतेनुसार तांत्रिक व वित्तिय गुण संयुक्त करण्यात आले. हयामध्ये मे. श्रीखंडे कन्सल्टंट प्रा.लि. हे प्रथम पसंतीचे निविदाकार ठरले आहेत. यास्तव सदर प्रकल्पाच्या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या कामासाठी मे. श्रीखंडे कन्सल्टंट प्रा.लि. यांनी भरलेला रु.९७,४५,८००/- (अधिक प्रचलित दराप्रमाणे सेवा कर) इतक्या रक्कमेचा म्हणजेच प्रकल्पाच्या अंदाजित किंमतीच्या (रु.२१,७३,००,०००/-) ४.४८% इतक्या दराचा (अधिक प्रचलित दराप्रमाणे सेवा कर) आर्थिक प्रस्ताव स्विकारणे आणि त्याची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करणे प्रस्तावित आहे.

४.२ श्री. द. म. सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी प्राधिकरणामार्फत यापूर्वी बांधण्यात आलेल्या आकाशमार्गिकांचा वापर कसा होत आहे अशी विचारणा केली. यावर महानगर आयुक्त यांनी आकाशमार्गिका ही मुळात एक चांगली संकल्पना असून काही आकाशमार्गिकांचा वापर बऱ्याच प्रमाणात होत असल्याचे सांगितले. तथापि, नवीन आकाशमार्गिकांचे प्रकल्प हाती घेण्याचे प्राधिकरणाने सन २००९ पासुन थांबविले आहे. प्रस्तावित आकाशमार्गिकेच्या आवश्यकतेसंबंधी माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सादर केले की, ठाणे-विटावा दरम्यान ये-जा करण्यासाठी जनतेला २.८० कि.मी. चालावे लागते किंवा रिक्षा-बसने प्रवास करण्यासाठी भाडे खर्च करावा लागतो. हे टाळण्यासाठी स्थानिक जनता रेल्वे मार्गाचा कमी वेळाचा व कमी खर्चाचा पर्याय स्विकारतात. त्यामुळे अपघात घडुन जिवितहानी होते. या आकाशमार्गिकेमुळे ठाणे-विटावा हे चालण्याचे अंतर कमी होवून जनतेसाठी सुरक्षित मार्गाची सोय उपलब्ध होणार आहे. सदर आकाशमार्गिकेची स्थानिक लोकप्रतिनिधींकडून सातत्याने मागणी होत आहे. यास्तव हया आकाशमार्गिकेचे काम विशेष बाब म्हणून दिनांक २७ जून, २०१४ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १३४व्या बैठकीच्या निर्णयानुसार हाती घेण्याचे प्रस्तावित आहे.

**निर्णय :** **त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने खालील ठराव मंजुर केला :-**

**ठराव क्र. १२६६:**

"**असा ठराव करण्यात येत आहे की**, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे ठाणे रेल्वे स्थानक ते विटावा (कळवा) या दरम्यान आकाशमार्गिका (Skywalk) बांधणेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (Project Management Consultant) म्हणून मे. श्रीखंडे कन्सल्टंटस् प्रा. लि. यांची रु.९७,४५,८००/- (अधिक प्रचलित दराप्रमाणे सेवा कर) इतक्या रकमेच्या म्हणजेच प्रकल्पाच्या अंदाजित किंमतीच्या ४.४८% (अधिक प्रचलित दराप्रमाणे सेवा कर) इतक्या शुल्काच्या दराने, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ :** **विस्तारीत नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत वसई-भाईंदर जोडणाऱ्या खाडीवरील पूलाच्या बांधकामाकरीता नव्याने प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

५.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या दिनांक २४ डिसेंबर, २००७ रोजीच्या १२०व्या बैठकीत नायगांव-भाईंदर दरम्यान वसई खाडीवर २.० कि.मी. लांबीच्या दुपदरी पूलाच्या बांधकामास रु. १०० कोटी इतकी प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. या प्रकल्पांत पश्चिमेकडील बाजूस रेल्वे लाईनला समांतर असलेल्या जून्या सद्यःस्थितीत बंद असलेल्या पूलाची दुरुस्ती करुन वाहतूकीसाठी योग्य करण्याच्या कामाचा अंतर्भाव होता. सदर काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC) यांचे मार्फत करण्याचे ठरविले होते. त्यांनी रेल्वे समांतर जूना पूल दुरुस्ती करण्याचे योग्य नसल्याचे सांगून त्यांनी नेमलेल्या प्रकल्प सल्लागारांच्या अहवालानुसार ५.६४ कि.मी. लांबीचे केबल स्टेड पूल प्रस्तावित केले. या प्रकल्पाची किंमत रु. ५६४ कोटी एवढी होती. सदर प्रकल्प वापरा व हस्तांतरीत करा (BOT) या धर्तीवर बांधणे शक्य नसल्याचेही त्यांनी कळविले. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून सदर प्रकल्पांस विलंब होत असल्यामुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सदर प्रकल्प राबविण्याचे ठरविले. यामध्ये सदर प्रस्तावित खाडीपूलाचे नव्याने सर्वेक्षण करुन नविन सरळ रेषेत पूल बांधणे व भविष्यातील वाहतूक विचार करुन पूलाच्या मार्गिकांची संख्या ठरविणे इ. कामाकरीता मे.स्टूप कंन्सल्टन्ट प्रा.लि. या प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार कंपनीची नेमणूक करण्यात आलेली आहे.

५.२ तद्नंतर, समितीच्या सदस्यांना सदर प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्यात आले. यामध्ये मुख्य अभियंता, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांनी सदर रस्त्याची वैशिष्टये सांगितली. सदर रस्त्याला भाईंदरकडील बाजूस व वसईकडील बाजूस मिळणा-या रस्त्याविषयी माहिती दिली. तसेच या पूलाकरीता तीन पर्यायी मार्गांचा अभ्यास करण्यात आल्याचे सांगितले. त्यापैकी पर्याय क्र.२ हा भूसंपादन, तिवरांची तोड, पुलाची लांबी व किंमत इ. बाबींमध्ये कमी असल्यामुळे तसेच बाधित झोपडया नसल्यामुळे निश्चित करण्यात आला असे सांगितले. तसेच या पूलामुळे भविष्यात पश्चिमेकडील बाजूस जोडमार्ग तयार होवून राष्ट्रीय महामार्ग क्र.८ला पर्यायी मार्ग तयार होईल. तसेच आपत्कालिन प्रसंगी राष्ट्रीय महामार्ग क्र.८ येथील वसई-भाईंदर खाडीवरील सद्यःस्थितीत असलेल्या पूलाच्या दुरुस्तीच्या वेळी प्रचंड वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागेल अशी परिस्थिती उद्भवणार नाही याची दक्षता घेण्यात येईल असे मुख्य अभियंता, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांनी सांगितले.

५.३ श्री. द.म. सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, या पूलामुळे आजूबाजूला होणा-या विकासकामांवर कर (Betterment Charges) स्वरुपात काही निधी गोळा होवू शकेल का? किंवा याबाबत अन्य पर्यायांची (उदा. टोल) तपासणी करावी लागेल जेणेकरुन इतक्या प्रचंड खर्चाची काही प्रमाणात वसूली होऊ शकेल. तसेच त्यांनी हा पूल न बांधता इतर अस्तित्वातील मार्गाचे रुंदीकरण किंवा नविन पर्यायी मार्ग तयार करुन वाहतूक सुधारणा करता येईल का अशी विचारणा केली. यावर महानगर आयुक्त यांनी निधी उभारण्याच्या विविध पर्यायांचा (Betterment Charges) शासन पातळीवर विचार होत असून टोलचा पर्याय शक्य दिसत नसल्याचे सांगितले. राष्ट्रीय महामार्ग ८ हा पर्याय लांब असून त्याला अजून रुंद करण्यातही मर्यादा आहे. तसेच, सदर पूल वसई येथे प्राधिकरणातर्फे प्रस्तावित असलेल्या ग्रोथ सेंटरसाठी पुरक ठरेल असेही सांगितले. श्री. ना. वि. मेराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी पांजू बेट येथे तेथील रहिवाश्यांना ये-जा करणेसाठी जिना ठेवण्यात यावा असे सुचविले. यावर महानगर आयुक्त यांनी या पुलावर फक्त पादचा-यांसाठी जिना न बांधता वाहने ये-जा करणेकरीता पोचमार्ग बांधणे जास्त योग्य होईल असे सांगितले, जेणेकरुन पोलीस वाहनांना सुरक्षेच्या दृष्टीने गस्त घालणे सुलभ होईल व स्थानिक रहिवाश्यांना देखील फायदा होईल.

५.४ तसेच श्री. ना. वि मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सुचविले की, या महत्वाच्या प्रादेशिक वाहतूक मार्गामुळे मुंबई आणि वसई-विरार संकुलामध्ये अधिक मार्गाची जोडणी तयार होईल व अशी जोडणी ''इंडिपेंडंट सेटेलाइट टाऊन'' अशी मुंबई महानगर क्षेत्राची जी नियमावली आहे त्यास पुरक ठरणार नाही. पुढे असेही नमूद केले की, वसई - विरार संकुलाच्या मास्टर प्लॅनमधील तरतूदींवर व मिरा-भाईंदर क्षेत्रावर काय परिणाम होईल याचा अभ्यास करणे जरुरी आहे.

५.५ वरील बाबींचे अवलोकन करुन सदर पूलाच्या एकूण रु. ८७५.५४ कोटी एवढया प्रशासकीय मान्यतेसाठी वरील सुचनांचा विचार करुन प्राधिकरणाच्या बैठकीत सादर करण्याकरीता कार्यकारी समितीने शिफारस केली.

**<u>निर्णय :</u>** **<u>त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-</u>**

**<u>ठराव क्र. १२६७:</u>**

**''असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिमेकडील वसई-भाईंदरला जोडणा-या

..१०/-

खाडीवरील पूलाच्या बांधकामाकरीता नव्याने एकूण प्रशासकीय मान्यता रु.८७५.५४ कोटी एवढया रक्कमेस प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत मान्यतेकरीता केलेल्या सुचनांचा विचार करुन सादर करण्यासाठी कार्यकारी समिती शिफारस करीत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.६ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्व द्रुतगती महामार्गावरील छेडा नगर जंक्शन, घाटकोपर (पूर्व) येथे वाहतुक सुधारणा प्रकल्प राबविणेबाबत.**

६.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नुकतेच सांताक्रुझ चेंबूर जोडरस्ता (SCLR) व पूर्व मुक्तमार्ग (Eastern Freeway) या रस्त्यांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. सांताक्रुझ चेंबूर जोडरस्ता व पुर्व मुक्तमार्ग या दोन्ही रस्त्यांवरील वाहतुक पूर्व द्रुतगती महामार्गास घाटकोपर (पूर्व) येथील छेडा नगर जंक्शन येथे मिळून त्यानंतर ठाणे व नवी मुंबई दिशेकडे वेगळी होते. त्यामुळे छेडा नगर जंक्शन येथे वाहतुकीची मोठया प्रमाणावर कोंडी होत आहे. तसेच अस्तिवातील छेडा नगर उड्डाणपुलावरुन सांताक्रुझ चेंबुर जोडरस्त्याकडे जाणारी वाहने आणि मानखुर्द / नवी मुंबई कडून येऊन महामार्गाकडे वळणारी वाहने यांची छेडा नगर उड्डाणपुलाचा शेवट व अमर महल उड्डाणपुलाची सुरुवात यातील सुमारे १०० मीटरच्या भागात सरमिसळ होत असल्याने येथे अपघातप्रवण क्षेत्र निर्माण झाले आहे.

६.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, छेडा नगर जंक्शन येथील वाहतुक कोंडी दुर करण्यासाठीच्या उपाय योजनांचा अभ्यास करण्यासाठी प्राधिकरणातर्फे मे. टेक्नोजेम कंन्सल्टंटस या सल्लागार संस्थेची नेमणुक करण्यात आली. सल्लागारांनी या ठिकाणी केलेल्या अभ्यासावरुन असे निदर्शनास आले की, सायन-ठाणे, सायन-मानखुर्द आणि मानखुर्द-ठाणे या दिशांकडे वाहतुकीचे प्रमाण सर्वाधिक असून या दिशांसाठी अतिरीक्त मार्गिका निर्माण करणे आवश्यक आहे.

६.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, सल्लागारांनी संपूर्ण अभ्यास करुन छेडा नगर जंक्शन येथील वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी विविध पर्याय सुचविले होते. या पर्यायांपैकी सर्वात उपयुक्त पर्याय निवडण्यासाठी प्राधिकरणातर्फे अतिरिक्त महानगर आयुक्त (१), मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली खालील सदस्यांची तज्ञ समिती स्थापन करण्यात आली होती :-

१. मुख्य अभियंता-१, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण - सदस्य

२. प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग, मुं.म.प्र.वि. प्राधिकरण - सदस्य

३. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,मुंबई - सदस्य

४. मुख्य अभियंता (रस्ते), बृहन्मुंबई महानगरपालिका -सदस्य

५. अतिरिक्त पोलिस आयुक्त (वाहतुक) -सदस्य

६. मुख्य अभियंता-२, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण - सदस्य सचिव

सल्लागारांनी सादर केलेल्या सर्व पर्यायांचा तज्ञ समितीने अभ्यास करुन यातील पुढील कामांचा समावेश असलेल्या पर्यायांची सर्वानुमते शिफारस केली :-

१. सायन-ठाणे दिशेकडील वाहतुकीसाठी अस्तित्वातील उड्डाणपुलाशेजारी अतिरीक्त उड्डाणपुल बांधणे.
२. मानखुर्द-ठाणे दिशेकडील वाहतुकीसाठी दुस-या पातळीवर उड्डाणपुल बांधणे.
३. अस्तित्वातील छेडा नगर उड्डाणपुलास अमर महल उड्डाणपुलास जोडण्यासाठी स्वतंत्र उन्नत मार्गिका बांधणे,
४. सायन -मानखुर्द दिशेकडील वाहतुकीसाठी भुयारी मार्ग बांधणे,
५. गरोडीया नगर येथील अस्तित्वातील भुयारी मार्ग महामार्गावर ठाणे दिशेकडे स्थलांतरीत करणे.

६.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, वरील प्रस्तावित कामांपैकी सायन-मानखुर्द दिशेकडील वाहतुकीसाठी भुयारी मार्ग बांधणे, या कामाच्या मार्गामध्ये विविध सेवावाहिन्यांचा अडथळा येत असल्याने सदर भुयारी मार्ग बांधणे अतिशय अवघड आहे. तसेच अ.क्र.१, २ व ३ ही कामे केल्यानंतर छेडा नगर जंक्शन येथील वाहतुकीतील सुमारे ६०% मुख्य दिशांकडील वाहतुक विना अडथळा पार होणार आहे. यामुळे उर्वरित दिशांकडील वाहतुकीवरील ताण कमी होणार आहे. वरील बाबी लक्षात घेऊन सद्यःस्थितीत छेडा नगर जंक्शन येथील वाहतुक सुधारणा प्रकल्पांतर्गत पुढील कामे प्रस्तावित करण्यात आली आहे :-

१. सायन-ठाणे दिशेकडील वाहतुकीसाठी अस्तित्वातील उड्डाणपुलाशेजारी तीन मार्गिकांचा अतिरिक्त उड्डाणपुल बांधणे- या पुलाची लांबी ६८० मीटर असून रुंदी १२ मीटर असेल.
२. मानखुर्द -ठाणे दिशेकडील वाहतुकीसाठी दुस-या पातळीवर दोन मार्गिकांचा उड्डाणपुल बांधणे - या पुलाची लांबी १२४० मीटर तर रुंदी ८.५० मीटर असेल.
३. अस्तित्वातील छेडा नगर उड्डाणपुलास अमर महल उड्डाणपुलास जोडण्यासाठी स्वतंत्र दोन मार्गिकांची उन्नत मार्गिका बांधणे- या उन्नतमार्गिकेची लांबी ६५० मीटर तर रुंदी ८.५० मीटर असेल.

६.५ महानगर आयुक्त यांनी या प्रकल्पाचा अंदाजपत्रकीय खर्च पुढीलप्रमाणे सादर केला :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सायन-ठाणे दिशेकडील वाहतुकीसाठी उड्डाणपुल बांधणे | : | रु. ५७.६६ कोटी |
| २. | मानखुर्द-ठाणे दिशेकडील वाहतुकीसाठी दुस-या पातळीवर उड्डाणपुल बांधणे | : | रु. ९४.३९ कोटी |
| ३. | अस्तित्वातील छेडा नगर उड्डाणपुलास अमर महल उड्डाणपुलास जोडण्यासाठी स्वतंत्र उन्नत मार्गिका बांधणे | : | रु. ५२.२८ कोटी |
| **४.** | **प्रकल्पाच्या बांधकामाचा अंदाजित खर्च (१+२+३)** | **:** | **रु. २०४.३३ कोटी** |
| ५. | सल्लागार मानधन (@ २%) | : | रु. ४.०९ कोटी |
| ६. | भाववाढ (@ १०%) | : | रु. २०.४३ कोटी |
| ७. | आकस्मिक खर्च (@ ५%) | : | रु. १०.२२ कोटी |
| ८. | सेवावाहिन्या हलविणे (@ ५%) | : | रु. १०.२२ कोटी |
| **९.** | **एकूण प्रकल्पाचा अंदाजित खर्च** | **:** | **रु. २४९.२९ कोटी** |

६.६ मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी सुचना केली की, सातत्याने बाहय यंत्रणेवर विसंबून राहण्यापेक्षा प्राधिकरणाने स्वतःची सल्लागार पध्दती विकसित करता येईल का याबद्दल विचार करावा.

६.७ श्री. ना. वि. मेराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी सदर प्रकल्प भविष्यातील वाहतूक गृहीत धरुन संकल्पित केला असणेबाबत विचारणा केली. यावर श्री. स.भ. तामसेकर, मुख्य अभियंता, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांनी सदर प्रकल्प पुढील १० वर्षांची वाहतूकवाढ गृहीत धरुन संकल्पित केला असल्याचे सांगितले. तसेच दिशानिहाय वाहतुकीत होणारी वाढ व त्यासाठी आवश्यक मार्गिकांबाबतची तक्तानिहाय माहिती सादर केली.

६.८ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सदर प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर कशा प्रकारे दिसेल अशी विचारणा केली. त्यानुसार श्री.स.भ. तामसेकर, मुख्य अभियंता, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांनी सदर प्रकल्पाचे भासमन चलतचित्र (animation) सादर केले.

६.९ वरील बाबींचे अवलोकन करुन महानगर आयुक्त यांनी 'मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पातंर्गत पुर्व द्रुतगती महामार्गावरील छेडा नगर जंक्शन, घाटकोपर (पुर्व) येथे वाहतुक सुधारणा प्रकल्प राबविणेबाबतचा' प्रस्ताव प्राधिकरणाच्या बैठकीत प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणेच्या शिफारसीसाठी कार्यकारी समितीच्या मंजूरीस्तव सादर केला असल्याचे सांगितले.

**<u>निर्णय :</u>** **<u>त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-</u>**

**<u>ठराव क्र. १२६८:</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (ड) व (आय) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पातंर्गत पूर्व द्रुतगती महामार्गावरील छेडा नगर जंक्शन, घाटकोपर (पूर्व) येथे वाहतूक सुधारणा प्रकल्प राबविणेबाबतच्या रु.२४९.२९ कोटी रक्कमेच्या खर्चाचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी प्राधिकरणाकडे शिफारस करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.७ :</u>** **<u>विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत काशिमिरा भाईंदर गोराई मनोरीत्तर (गोराई ते मनोरीत्तर) रस्ता, पुलांचे बांधकाम करणे (मुर्धा, राई आणि मोरवा खाडी पुल) आणि मुख्य जेट्टी रस्त्यापासून मुख्य रस्त्यापर्यंत अंतर्गत रस्त्याची सुधारणा करणे.</u>**
**<u>- प्रकल्पाच्या सुधारित किंमतीस मंजूरी मिळणेबाबत.</u>**

७.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राव्यतिरीक्त प्राधिकरणाच्या मान्यतेनुसार विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प हाती घेतला आहे. त्यानुसार मिरा-भाईंदर क्षेत्रातील काशिमिरा-भाईंदर-गोराई - मनोरीतर रस्त्याच्या १६.५० कि.मी. लांबीच्या कामास रू.१३.२० कोटी एवढी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली. त्यापैकी टप्पा १ मध्ये रू.९.६१ कोटी एवढया रक्कमेचे काम पूर्ण करण्यात आले आहे. त्यामध्ये काशिमिरा-भाईंदर-गोराई-मनोरीतर (भाईंदर-गोराई) रस्त्याच्या ११ कि.मी. लांबीची सुधारणा करण्याच्या कामाचा समावेश होता. टप्पा-२ मध्ये काशिमिरा-भाईंदर-गोराई-मनोरीतर (गोराई ते मनोरीतर) रस्त्याच्या उर्वरित लांबीची सुधारणा, रस्त्यावरील कमकुवत पुलांचे बांधकाम करणे (मुर्धा, राई आणि मोरवा खाडी पूल) आणि जेट्टी रस्त्याला जोडणा-या अंतर्गत रस्त्यांची सुधारणा करण्याच्या कामांचा समावेश करण्यात

आला व त्यास २००९-१० या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पातील पुर्नविनियोजनानुसार काशिमिरा-भाईंदर-गोराई - मनोरीतर रस्त्याच्या व पुलांच्या प्रकल्पास प्राधिकरणाकडून मान्यता प्रदान करण्यात आली होती. त्यानुसार रू.२४.६६ कोटी एवढी निविदा रक्कम असलेले टप्पा-२ चे काम हाती घेण्यात आले. सद्यस्थितीत काम पूर्ण झाले असून ते वाहतूकीसाठी रस्ता व खाडीपूल खुले करण्यात आले आहेत.

७.२ महानगर आयुक्तांनी सदर कामांचा थोडक्यात आढावा खालीलप्रमाणे दिला :-

अ) गोराई ते मनोरीतर रस्त्याची सुधारणा करणे - सदर रस्त्याची लांबी ५.५ कि.मी असून सदर रस्त्याचे ९ मी. पर्यंत रूंदीकरण करण्यात येऊन माहे ऑगस्ट, २०१० मध्ये काम पूर्ण करण्यात आले.

ब) मुर्धा, राई व मोरवा येथील खाडी पूलांचे बांधकाम :
मुर्धा व राई या खाडी पुलांचे बांधकाम दोन टप्प्यात जून २०१२ पर्यंत पूर्ण करण्यात येऊन ते वाहतूकीसाठी खुले करण्यात आले. तथापि, मोर्वा खाडी पूलाचे रूंदीकरण हे CRZ क्षेत्रात येत असल्याने व त्यात तिवरांची झुडपे बाधित होत असल्याने सदर पुलाच्या बांधकामासाठी MCZMA ची परवानगी आवश्यक होती. MCZMA व मा. उच्च न्यायालयाची परवानगी सप्टेंबर, २०१२ पर्यंत घेण्यात येउन पुलाच्या पहिल्या टप्प्याचे प्रत्यक्ष बांधकाम माहे नोव्हेंबर, २०१२ मध्ये सुरू होऊ शकले. सदर पहिल्या टप्प्याचे बांधकाम माहे ऑक्टोंबर, २०१३ मध्ये पूर्ण करण्यात येऊन तो वाहतुकीस खुला करण्यात आला व दुस-या टप्प्याचे बांधकाम देखील पूर्ण करण्यात येऊन ते वाहतुकीस खुले करण्यात आले आहे.

क) तसेच गोराई क्षेत्रातील मुख्य रस्ता ते जेट्टी रस्त्याची सुधारणा व रूंदीकरणाच्या कामात एस्सेलवर्ल्ड गेट ते ग्लोबल विपश्यना पगोडा ते जेट्टी पर्यंतच्या रस्त्याचे अतिरीक्त काम हे सदर क्षेत्र पर्यटनाच्या दृष्टीने व स्थानिक लोकांना जेट्टीच्या सोयीसाठी अतिरीक्त लांबीच्या रस्त्याच्या कामासाठी महानगर आयुक्तांची मंजूरी घेण्यात आली होती. त्यानुसार रस्त्याचे काम हाती घेऊन ते पूर्ण करण्यात आले. प्रकल्प पूर्ण करावयाच्या हया वाढीव बाबीमुळे व प्रकल्प कालावधीत झालेल्या भाववाढीमुळे कंत्राटातील तरतूदीनुसार देय असलेल्या भाववाढीचा खर्च हयामुळे प्रकल्पाच्या मूळ किंमतीत खालीलप्रमाणे बदल झाला आहे :-

| अ. क्र. | तपशिल | एकूण किंमत (रु. कोटीत) |
|---|---|---|
| १. | प्रकल्पाची मूळ निविदा रक्कम | २४.६६ |
| २. | अतिरीक्त कामामुळे होणारा एकूण वाढीव खर्च | ५.५३ |
| ३.. | कंत्राटातील तरतूदीनुसार देय असलेल्या भाववाढीचा खर्च | ६.६५ |
| ४. | प्रकल्पाची सुधारीत किंमत | ३६.८४ |

७.३ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सदर प्रस्तावाबाबत अशी विचारणा केली की, सदर अतिरीक्त रस्त्याच्या कामाबाबत नकाशावर सदर रस्त्याची व्याप्ती कुठून कुठपर्यंत होती, त्यावर महानगर आयुक्तांनी असा खुलासा केला की, हा रस्ता एस्सेलवर्ल्डच्या गेटपासून ग्लोबल विपश्यना पगोडा मार्गे प्रस्तावित जेट्टीपर्यंत घेण्यात आला होता. सदर रस्त्याचे काम सन २०१० मध्ये पूर्ण झाल्याचे सांगितले.

**<u>निर्णय :</u>** **<u>त्यानंतर, बाब टिप्पणीमधील प्रस्ताव मान्य करून कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-</u>**

**<u>ठराव क्र. १२६९:</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पातंर्गत काशिमिरा-भाईंदर-गोराई मनोरीतर (गोराई ते मनोरीतर) रस्त्याचे, पुलांचे बांधकाम करणे (मुर्धा, राई आणि मोरवा खाडी पूल) आणि जेट्टी रस्त्यापासून मुख्य रस्त्यापर्यंत अंतर्गत रस्त्याची सुधारणा करणे या कामात अतिरिक्त काम / बाबी व प्रकल्पाच्या कालावधीत झालेल्या भाववाढीमुळे प्रकल्पाच्या कंत्राट किंमतीत बदल होऊन प्रकल्पाच्या रु.३६.८४ कोटी एवढया सुधारीत किंमतीस मान्यता प्रदान करीत आहे. तसेच त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.८ :</u>** **<u>शिळफाटा कल्याण व मुंब्रा जंक्शन येथील प्रस्तावित उडडाणपुलांच्या बांधकामाकरीता सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळणेकरिता प्राधिकरणास शिफारस करणेबाबत.</u>**

८.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशाचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत हाती घेतलेल्या सुमारे रु.१११३.३५ कोटी अंदाजित खर्चाच्या अतिरिक्त रस्ते सुधारणा व उड्डाणपूल

बांधकामाच्या कामास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ०८ सप्टेंबर, २०११ रोजी झालेल्या १२९ व्या बैठकीत ठराव क्र. १२६४ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. सदर कामांमध्ये मुंब्रा जंक्शन तसेच शिळफाटा कल्याण जंक्शन येथे उड्डाणपूलांच्या बांधकामांचा समावेश आहे. वरील दोन्ही ठिकाणच्या प्रस्तावित उड्डाणपूलांच्या कामाकरीता भौगोलिक सर्वेक्षण, वाहतूकीचा अभ्यास करणे, वाहनांचे उगम-गंतव्यचे सर्वेक्षण करणे, संकल्पचित्र तयार करणे व अंदाजपत्रके बनविणे इ. कामांसाठी मे.स्टूप कन्सल्टंट प्रा.लि. यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमण्यात आले. प्राधिकरणाच्या दिनांक ०८ सप्टेंबर, २०११ रोजी झालेल्या १२९व्या बैठकीमध्ये मंजूर केल्याप्रमाणे मुंब्रा जंक्शन येथील उड्डाणपूलाच्या बांधकामाची अंदाजित किंमत रु.५३.२१ कोटी होती. तसेच शिळफाटा जंक्शन येथील उड्डाणपूलाच्या बांधकामाची अंदाजित किंमत रु.९७.२३ कोटी होती. प्रकल्प सल्लागाराने केलेल्या वाहतूकीच्या सर्वेक्षणानुसार मुंब्रा जंक्शन येथे सकाळी दर ताशी अधिकतम ५६४२ तसेच शिळफाटा जंक्शन येथे संध्याकाळी अधिकतम ६९९३ इतक्या PCU ची नोंद करण्यात आली. यामुळे प्रशासकीय मान्यतेत मंजूर असलेल्या २+२ मार्गिकांऐवजी ३+३ मार्गिकांच्या उड्डाणपूलांचे बांधकाम करणे अनिवार्य आहे. तसेच मुंब्रा जंक्शन येथे ऐरोली-कटाई हा नविन प्रस्तावित मार्ग येऊन मिळत असल्यामुळे मुंब्रा जंक्शन येथील उड्डाणपूलाची लांबी वाढविणे क्रमप्राप्त ठरले. सुधारीत आराखडयाप्रमाणे आता वरील दोन्ही उड्डाणपूल बांधकाम प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झाली आहे. त्याचे विश्लेषण महानगर आयुक्तांनी पुढीलप्रमाणे विषद केले :-

१. **मुंब्रा जंक्शन येथील प्रस्तावित उड्डाणपूल :-**

अ) प्रशासकीय मान्यतेप्रमाणे अंदाजित किंमत रु.५३.२१ कोटी

ब) प्रकल्पाची सुधारीत अंदाजित किंमत रु.१०७ कोटी

**किंमतीत वाढ झालेल्या बाबी :**

क) प्रशासकीय मान्यता घेतांना १७.२ मीटर रुंदीचा २ + २ मार्गिकांचा उड्डाणपूल बांधण्याचे प्रस्तावित होते. उड्डाणपुलाची मूळ अंदाजित किंमत रु.२३.२५ कोटी ही जिल्हा दर सूची सन २०११-१२ वर आधारीत होती. उड्डाणपूलाच्या सुधारीत आराखडयात २४.२ मीटर रुंदीचा ३ + ३ मार्गिकांचा उड्डाणपूल बांधणे प्रस्तावित असून यामुळे अतिरिक्त १ + १ मार्गिकांची वाढ झाल्यामुळे (रु. ८.३३ कोटी) तसेच प्रचलित जिल्हा दर सूची सन २०१३-१४ च्या दरांतील फरकामुळे (रु.२.९२ कोटी) किंमतीत एकूण रु. ११.२५ कोटी वाढ झाली आहे.

..१७/-

ड) प्रस्तावित ऐरोली-कटाई नाका रस्त्याचे विकिरण (Dispersal) मुंब्रा उड्डाणपूलाखाली होत असल्यामुळे उड्डाणपूलाच्या लांबीत ३०० मीटर ऐवजी ५४० मीटर वाढ झाली. त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत रु. २१.५१ कोटी वाढ झाली आहे.

इ) सुधारीत आराखडयानुसार रॅम्पच्या लांबीत २८० मीटर ऐवजी ३८५ मीटर वाढ झाल्याने किंमतीत रु. ४.१९ कोटी वाढ झाली आहे.

ई) मूळ प्रस्तावातील उड्डाणपूलाखालील रस्ते (Slip Road), गटारे व नाले यामध्ये थोडा बदल केल्यामुळे प्रकल्पाच्या किमतीत रु.२.०३ कोटी रकमेची बचत झाली आहे.

उ) मूळ प्रस्तावात मुंब्रा बायपास येथील भुयारी पादचारी मार्गाच्या विस्तारीकरणाचा समावेश नव्हता. सदर विस्तारीकरणाचे काम आवश्यक असल्यामुळे प्रकल्पाच्या किमतीत रु. ३.८३ कोटी वाढ झाली आहे.

ऊ) सदर रस्त्याच्या दोन्ही बाजूला सेवा रस्ते प्रस्तावित केले असल्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत सुमारे रु. ६.०० कोटी वाढ होत आहे.

ए) प्रकल्पाचा भौतिक आकस्मिक खर्च, भविष्यातील दरवाढ व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे शुल्क हे प्रकल्पाच्या किंमतीवर आधारीत असल्यामुळे प्रकल्पाच्या टक्केवारी खर्चात (Centage Charges) रक्कम रु. ८.९९ कोटी वाढ होत आहे.

**एकूण निव्वळ वाढ :- रु. ५३.७४ कोटी .**

२. **शिळफाटा-कल्याण जंक्शन येथील प्रस्तावित उड्डाणपूल :**

अ) प्रशासकीय मान्यतेप्रमाणे अंदाजित किंमत रु. ९७.२३ कोटी

ब) प्रकल्पाची सुधारीत अंदाजित किंमत रु. २८६ कोटी

**किंमतीत वाढ झालेल्या बाबी :**

क) प्रशासकीय मान्यता घेतांना शिळफाटा जंक्शन व कल्याण जंक्शन येथे दोन स्वतंत्र उड्डाणपूल बांधण्याचे प्रस्तावित होते. या दोन्ही स्वतंत्र २+२ मार्गिकांच्या (१७.२ मीटर रुंद) उड्डाणपूलांची एकत्रित लांबी ६४० मीटर इतकी होती. २+२ मार्गिकांऐवजी ३+३ मार्गिकांचे उड्डाणपूल बांधण्यासाठी रु. १९.९१ कोटी वाढ होत आहे.

ड) वाहतूकीच्या सर्वेक्षणानुसार महापे व मुंब्राकडून डोंबिवलीच्या दिशेने ये-जा करणा-या वाहनांची संख्या सुध्दा लक्षणीय असल्याचे आढळून आले. वरील दोन्ही स्वतंत्र उड्डाणपूलांमध्ये फक्त ६० मीटर एवढेच अंतर असल्याने उड्डाणपूलावरील जडवाहतूकीस अडथळा टाळण्यासाठी दोन स्वतंत्र पूलाऐवजी एक सलग उड्डाणपूल बांधण्याचे प्रस्तावित आहे. महापे डोंबिवली ये-जा जडवाहतूकीस उड्डाणपूलाखाली जास्त जागा उपलब्ध व्हावी यासाठी प्रस्तावित उड्डाणपूलाच्या खांबांची उंची दोन्ही जंक्शनच्या दरम्यान किमान ५.५ मीटर इतकी ठेवण्याचे प्रस्तावित आहे. उड्डाणपूलाची वाढलेली ९३० मीटर लांबी तसेच किमान ५.५ मीटर खांबांच्या उंचीमुळे अंदाजपत्रकात एकूण रक्कम रु. ८०.२३ कोटी वाढ झाली आहे.

इ) प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता घेताना मूळ अंदाजित किंमत जिल्हा दर सूची सन २०११-१२ वर आधारीत होती. सुधारीत अंदाजित किंमत जिल्हा दर सूची सन २०१३-१४ वर आधारीत असून दरांतील फरकामुळे रु. १०.१२ कोटी वाढ होत आहे.

ई) सुधारीत आराखडयातील प्रस्तावानुसार उड्डाणपूलाखाली होणा-या जड वाहतूकीकरीता कॉंक्रीटचे रस्ते बांधणे, आर.सी.सी.ची गटारे बांधणे इ. कामांकरीता सुमारे रु.२३.६५ कोटी वाढ होत आहे.

उ) ठाणे महानगरपालिकेने सुचविल्याप्रमाणे सेवारस्त्यांच्या बांधकामाकरीता सुमारे रु. १६.०० कोटी वाढ अपेक्षित आहे.

ऊ) उड्डाणपूलाच्या बांधकामासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण महामंडळाच्या अति उच्च दाबाच्या एकूण ४ वाहिन्या नविन मनोरा बांधून उंच करणे आवश्यक आहे. तसेच ठाणे महानगरपालिकेच्या जलवाहिन्यासुध्दा स्थलांतरीत करणे आवश्यक आहे. यामुळे प्रकल्पाच्या किमतीत सुमारे रु. ११.०० कोटी वाढ झाली आहे.

ए) प्रकल्पाचा भौतिक आकस्मिक खर्च, भविष्यातील दरवाढ व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे शुल्क हे प्रकल्पाच्या किंमतीवर आधारीत असल्यामुळे प्रकल्पाच्या टक्केवारी खर्चात (Centage Charges) रक्कम रु.२७.७७ कोटी वाढ होणार आहे.

**एकूण निव्वळ वाढ :- रु. १८७.०१ कोटी.**

३. **प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या शुल्कात होणारी वाढ :**

या प्रकल्पासाठी मे. स्टूप कन्सल्टंट प्रा.लि. यांची संकल्पचित्र पडताळणी व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून कार्यकारी समितीच्या दिनांक २९ ऑक्टोबर, २०१३ रोजी झालेल्या २३९ व्या बैठकीत ठराव क्र. १२३४ नुसार नियुक्ती केली. त्यांना प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता रक्कम रु. १५० कोटी वर १.८% अधिक सेवा कर या दराने रक्कम रु.२.७० कोटी शुल्कावर नियुक्त करण्यात आले आहे. वर उल्लेखिलेल्या विविध कारणांमुळे मुंब्रा जंक्शन व शिळफाटा कल्याण जंक्शन येथील उड्डाणपूलांच्या आराखडयात बदल झाल्याने व पर्यायाने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या कर्तव्ये, जबाबदा-या तसेच प्रकल्पासाठी लागणारे मुख्य व्यावसायिक कर्मचारी यांच्या संख्येत होणारी वृध्दी यांची त्या प्रमाणात वाढ होत असून त्यांचे शुल्क सुधारीत किमतीवर अदा करणे आवश्यक आहे. याकरीता व प्रकल्पाच्या एकूणच वाढलेल्या किंमतीच्या अनुषंगाने सल्लागारांच्या शुल्काबाबत सल्लागारांशी वाटाघाटी करण्यात आल्या. वाटाघाटी दरम्यान सल्लागाराने कामाच्या वाढलेल्या व्याप्तीच्या अनुषंगाने विनंती प्रस्तावातील मान्य केलेल्या ११.५ ऐवजी १६ मनुष्यबळ दरमहा पुरविण्याचे मान्य केले. याकरिता प्रकल्प सल्लागाराने १.६६% अधिक सेवाकर इतक्या सुधारीत शुल्कात काम करण्याची तयारी दर्शविली आहे. या टक्केवारीने सुधारीत प्रशासकीय किंमतीवरील एकूण शुल्क रक्कम रु. ५.१५ कोटी इतके येत आहे.

८.२ चर्चेदरम्यान, श्री. द. म. सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सांगितले की, बाब टिप्पणीतील परिच्छेद क्र. ७ मध्ये असे विषद केले आहे की, दोन्ही उड्डाणपूलांखालील रस्ते (Slip Road) व सेवा रस्त्यांच्या बांधकामाकरीता सुमारे ११४ पक्की घरे व ७२ कच्च्या झोपडया अतिक्रमीत असून त्या पाडून सदर जागा ठाणे महानगरपालिकेने रस्त्याच्या बांधकामाकरीता प्राधिकरणाच्या ताब्यात द्यावयाची आहे. सदर पुलांचे बांधकाम ठाणे महागनरपालिकेने अतिक्रमणे काढून दिल्यानंतर हाती घेण्यात यावे.

८.३ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, अतिक्रमणे काढण्यासाठी काय उपापयोजना केलेली आहे ? यावर उत्तर देतांना मुख्य अभियंता, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांनी असे सांगितले की, अतिक्रमणे काढण्याची जबाबदारी ठाणे महानगरपालिकेची असून ठाणे महानगरपालिकेचे प्रतिनिधी, प्राधिकरणाचे प्रतिनिधी व सल्लागारांचे प्रतिनिधी यांनी संयुक्तपणे अतिक्रमणांचा सर्व्हे करुन त्याचे नकाशे व यादी ठाणे महानगरपालिकेकडे सुपूर्द केली आहे. या संदर्भात ठाणे महानगरपालिकेशी MoU करण्यात येत आहे.

८.४ मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे निर्देश दिले की, ठाणे महानगरपालिकेव्दारे अतिक्रमणे काढून टाकल्याशिवाय कामास सुरुवात करण्यात येऊ नये.

८.५ श्री. ना. वि. मेराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशीही विचारणा केली की, उड्डाणपूलांची संकल्पचित्रे पुढील किती वर्षांची वाहतूक गृहीत धरुन तयार करण्यात येणार आहेत? यावर उत्तर देतांना मुख्य अभियंता यांनी असे सांगितले की, सन २०४४ पर्यंतच्या वाहतूकीतील वाढीचा अभ्यास करुन संकल्पचित्रे बनविण्यात आली आहेत.

**निर्णय : त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला : -**

**ठराव क्र. १२७०:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याव्दारे मुंब्रा जंक्शन व शिळफाटा-कल्याण जंक्शन येथे उड्डाणपूल बांधणे या प्रकल्पांच्या अंदाजित खर्चास प्राधिकरणास सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.

१. मुंब्रा जंक्शन येथे उड्डाणपूल व त्या अनुषंगाने करावयाच्या इतर बाबींच्या बांधकामांकरीता अंदाजित खर्च रु. १०७ कोटीस् प्राधिकरणास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.
२. शिळफाटा-कल्याण जंक्शन येथे उड्डाणपूल व अनुषंगाने करावयाच्या इतर बाबींच्या बांधकामांकरीता अंदाजित खर्च रु.२८६ कोटीस् प्राधिकरणास सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.
३. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना शुल्क स्वरुपात सुधारीत अंदाजित रकमेवर १.६६% अधिक सेवाकर या सुधारीत दराने रक्कम रु. ५.१५ कोटी अदा करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही योग्य त्या फेरबदलांसह करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.९ :</u> <u>मुंबई महानगर प्रदेशाच्या बाहय क्षेत्रातील रस्त्यांची सुधारणा योजनेअंतर्गत रस्त्यांच्या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे. एक्स. सी. सी. इंजिनिअर्स आणि प्लॅनर्स या कंपनीच्या लघुत्तम निविदेस मंजूरी मिळणेबाबत.</u>**

९.१ या प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशाच्या बाहयक्षेत्रातील रस्त्यांच्या सुधारणा करण्याच्या कामांतर्गत ठाणे जिल्हा परिषद व रायगड जिल्हा परिषद येथील कामाकरीता दिनांक २७ जून, २०१४ रोजीच्या प्राधिकरणाच्या १३४व्या बैठकीत रु.६९.४१ कोटीच्या कामांकरीता प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. त्यापैकी रु.५ कोटींपेक्षा जास्त किंमतीची कामे प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्यात येणार असून त्यापेक्षा कमी किंमतीच्या कामांना ९०% निधी प्राधिकरणामार्फत उपलब्ध करुन दिला जाणार आहे.

९.२ या कामांपैकी ठाणे जिल्हा परिषदेची रु.१४.६० कोटीची २ कामे व रायगड जिल्हा परिषदेची रु.४३.०० कोटीची एकूण ४ कामे प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आली असून या सर्व कामांचा संक्षिप्त अहवाल तयार करणे, अदांजपत्रके तयार करणे, निविदा तयार करणे, प्रकल्प व्यवस्थापन व देखरेख करणे इत्यादी कामाकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमण्यासाठी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार दोन इच्छूक सल्लागारांच्या निविदा प्राप्त झाल्या.

९.३ त्यापैकी मे. एक्स.सी.सी.इंजिनियर्स आणि प्लॅनर्स यांनी १.९८% व मे. पटवर्धन अँड असोसिएटस् यांची २.१०% दराची निविदा प्राप्त झालेली आहे.

९.४ यावर श्री. ना. वि. मेराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी प्रथम लघुत्तम निविदाकार यांची कामाबाबतची योग्यता तपासली आहे का याबाबत विचारणा केली. याबाबत मुख्य अभियंता, मुं.म.प्र.वि. प्राधिकरण यांनी सल्लागाराला योग्य अनुभव असल्याचे सांगितले. यानुसार सर्व सदस्यांनी सदर प्रस्ताव मान्य करण्यास हरकत नसल्याचे सांगितले.

**<u>निर्णय :</u> <u>त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला : -</u>**

**<u>ठराव क्र. १२७१:</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ७चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे बाहय

क्षेत्रातील रस्त्याच्या सुधारणा योजनेअंतर्गत रस्त्यांच्या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन कामाकरीता मे.एक्स.सी.सी. इंजिनियर्स आणि प्लॅनर्स या प्रथम लघुत्तम सल्लागार कंपनीची १.९८% दराची रु.१,१४,०४,८००/- (रुपये एक कोटी चौदा लाख चार हजार आठशे फक्त) सेवा कर वगळून निविदा मंजूर करण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१० : विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत - खोपोली शहर वळण रस्त्याचे पुलांसह दुपदरीकरण व सुधारणा करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी लघुत्तम निविदेस मंजूरी मिळणेबाबत.**

१०.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने लोकप्रतिनिधींकडून करण्यात आलेल्या मागणीनुसार प्राधिकरण क्षेत्रातील प्रादेशिकदृष्टया महत्व असलेली कामे हाती घेण्याचे ठरविले होते व अशा कामांना प्राधिकरणाच्या दिनांक २७ जून, २०१४ रोजी झालेल्या १३४व्या बैठकीत ठराव क्र.१३०४ अन्वये रस्त्याच्या व उड्डाणपूलाच्या रु.३६२८.५१ कोटी इतक्या अदांजित किंमतीला प्रशासकीय मंजूरी देण्यात आली. सदर कामामध्ये खोपोली शहर वळण रस्त्याच्या दुपदरीकरण व सुधारणा करणे या कामांचा समावेश आहे. सदर मान्यतेच्या व्याप्तीमध्ये - खोपोली शहर वळण रस्त्याचे पुलांसह दुपदरीकरण व सुधारणा करणे या कामाचा समावेश असून रु. २३ कोटी इतक्या रक्कमेची तरतूद आहे. विषयांकित कामाची निविदा मागविण्यात आली होती.

१०.२ विषयांकित कामासाठी एकूण ४ कंत्राटदारांनी निविदा खरेदी केल्या त्यापैकी एका कंत्राटदाराकडून तांत्रिक बाबीची पूर्तता न झाल्याने त्यास बाद ठरविले. प्राप्त देकारांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | निविदाकाराचे नाव | प्राप्त देकार | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | -२३.४०% कमी | प्रथम लघुत्तम निविदाकार |
| २ | मे. जे.एम. म्हात्रे इंन्फ्रा. प्रा.लि. | + ५.५% जास्त | तृतीय लघुत्तम निविदाकार |
| ३ | मे. ठाकूर इंन्फ्राप्रोजेक्टस्. प्रा.लि. | -२.५% कमी | व्दितीय लघुत्तम निविदाकार |

..२३/-

१०.३ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी सदर कंत्राटदाराकडून इतक्या कमी दरात काम कसे करण्यात येईल याबददल विचारणा केली असता महानगर आयुक्त यांनी याबद्दल मे.अजवानी कडून खालीलप्रमाणे खुलासा प्राप्त झाल्याचे सांगितले :-

अ) मे. अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.ही पब्लिक लिमिटेड कंपनी असून त्यांच्याकडे स्वतःच्या मालकीची रस्त्याच्या कामाला उपयुक्त ठरणारी यंत्रसामुग्री ब-याच प्रमाणात आहे.

ब) सद्यःस्थितीत त्यांनी विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पॅकेज-१ चे मोठया प्रमाणात काम पूर्ण केले आहे व त्यांचेकडे या कामावरुन मोकळी झालेली यंत्रसामुग्री व तांत्रिकी अधिकारी उपलब्ध आहेत.

क) या कामासाठी जास्त प्रमाणात लागणारा कच्चा माल म्हणजे खडी हा सदर कामाच्या ठिकाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे व त्यामुळे हा माल वाजवीपेक्षा कमी दरात उपलब्ध होईल.

ड) त्यांच्या स्वतःच्या मालकीचा कॉंक्रिट व अस्फाल्ट प्लान्ट कामाच्या ठिकाणी उभारण्यात येणे शक्य असल्याने गाडयांची ये-जा होण्यासाठी लागणा-या खर्चामध्ये ब-याच प्रमाणात बचत होणार आहे.

**निर्णय : उपरोक्त बाबीचा विचार करता बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :**

**ठराव क्र. १२७२:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे, विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाअंतर्गत खोपोली शहर वळण रस्त्याचे पूलांसह दुपदरीकरण व सुधारणा हया कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे. अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि यांची किंमत रु.१८,२१,९९,४९४/- (रुपये अठरा कोटी एकवीस लाख नव्व्याण्णव हजार चारशे चौ-याण्णव फक्त) ची लघुत्तम निविदा अंदाजपत्रकीय देयकापेक्षा २३.४०% कमी दराने असलेली निविदा स्विकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की**, प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याकरिता आवश्यक ती सर्व पुढील सर्व कार्यवाही करण्याकरिता महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.११ : मोनोरेलच्या नियोजित पाच स्थानकांना पादचारी पुलाने जोडण्याकरिता सल्लागाराची नियुक्ती करणे.**

११.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मोनोरेलचा टप्पा-१ वडाळा ते चेंबूर हा दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१४ रोजी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते लोकार्पीत करण्यात आला आहे. प्रवाशांना मोनोरेल स्थानकावरुन जवळील उपनगरीय रेल्वेस्थानक व रस्त्यांवर वाहतूकीचा खोळंबा न करता प्रभाविपणे विखुरण्यासाठी टप्पा-१ प्रकल्पांतर्गत, सर्व स्थानक परिसरातील वाहतूक सुधारणा करण्याची योजना (SATIS) यशस्वीरीत्या अंमलबजावणी करण्यात आलेली आहे. प्रवाशांना सुरळीत व सुरक्षित, वाहतूकीला अडथळा न करता मोनोरेलच्या स्थानकापर्यंत जाण्यासाठी ती स्थानके उपनगरीय रेल्वे स्थानकांना, के.ई.एम रुग्णालय तसेच महत्वाच्या ठिकाणी पादचारी पुलाने खालील ठिकाणी जोडण्याचे प्रस्तावित आहे :-

१) मोनोरेल भक्तीपार्क स्थानक ते निवासी संकुल
२) वडाळा मोनोरेल स्थानक ते वडाळा उपनगरीय रेल्वे स्थानक
३) आंबेडकर नगर मोनोरेल स्थानक ते के.ई.एम रुग्णालय
४) लोअर परेल मोनोरेल स्थानक ते लोअर परेल उपनगरीय रेल्वे स्थानक
५) संत गाडगे महाराज मोनोरेल स्थानक ते महालक्ष्मी उपनगरीय रेल्वे स्थानक

११.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, या कामाकरीता सविस्तर आराखडा तयार करुन प्रकल्प व्यवस्थापन करण्यासाठी सल्लागाराची नेमणूक करणे प्रस्तावित आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या ई-निविदा प्रक्रियेव्दारे सल्लागारांकडून विनंती प्रस्तावाकरीता (RFP) दिनांक १२ सप्टेंबर, २०१४ रोजी वर्तमानपत्रामध्ये तसेच प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर ई-निविदेव्दारे जाहिरात प्रसारीत करण्यात आली व दिनांक १४ ऑक्टोबर, २०१४ पर्यंत तीन सल्लागारांचे प्रस्ताव प्राप्त झाले. विनंती प्रस्तावाच्या खंड २५.१ (a) अन्वये तांत्रिक व वित्तीय गुण संयुक्त करुन, जास्त गुण जो सल्लागार संपादन करेल त्या सल्लागारास प्रकल्प सल्लागार म्हणून नेमण्यात येईल. M/s.XCC Engineers & Planners यांचे तांत्रिक व वित्तीय गुण जास्त असल्यामुळे मुल्यमापन समितीने M/s. XCC Engineers

& Planners यांची नेमणूक करण्याची तसेच खंड क्रमांक २६ नुसार जो सल्लागार तांत्रिक व वित्तीय निकषात जास्त गुण संपादन करेल अशा सल्लागारास वाटाघाटीसाठी निमंत्रण देण्यात यावे अशी शिफारस केली. M/s. XCC Engineers & Planners या सल्लागाराने रु. १,४९,१६,०००/- इतक्या रकमेची मागणी केली होती. वाटाघाटीनंतर सल्लागाराने रु. १,२६,९९,७५०/- इतक्या रक्कमेचा सुधारीत प्रस्ताव सादर केला. त्यास अनुसरुन M/s.XCC Engineers & Planners यांची सल्लागार म्हणून नियुक्त करण्याची बाब टिप्पणी कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे.

११.३ मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी या पादचारी पुलामुळे लोकांचा प्रवास सुरळीत व सुरक्षित, वाहतूकीला अडथळा न करता मोनोरेल स्थानकांपर्यत पोहोचण्यास उपयुक्त ठरेल असे सांगितले.

११.४ श्री. द.म. सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी विचारणा केली की, एका सल्लागाराला पाचही पादचारी पुलांचे काम दिले तर सल्लागारांकडून विलंब होण्याची शक्यता असल्यामुळे सदर पुलांचे काम वेगवेगळया सल्लागारांना देणे उचित ठरेल का? यावर प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांनी असे सांगितले की, सदर प्रकल्पाची व्याप्ती लहान असल्यामुळे पाचही पादचारी पूलांचे काम वेगवेगळया सल्लागारांना दिले तर त्यांची सल्लागार फी वाढणार आहे. प्रस्तावित सल्लागारांकडे सदर पाचही पादचारी पूलाच्या कामाकरीता आवश्यक मनुष्यबळ असल्यामुळे विलंब होण्याची शक्यता कमी आहे. तसेच प्रस्तावित पादचारी पुल साधारणतः मोनोरेल टप्पा-२ वडाळा ते महालक्ष्मीपर्यंत कार्यान्वित होण्यापूर्वीच पूर्ण करावयाचे आहेत. त्याचप्रमाणे या सल्लागाराकडे प्रकल्प राबविण्याकरीता लागणारे मनुष्यबळ आणि क्षमता आहे.

११.५ तद्नंतर, श्री. द. म. सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी सदर पादचारी पुलांच्या कामाकरीता साधारणतः किती खर्च अंदाजित आहे, अशी विचारणा केली असता प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी असे नमूद केले की, या सर्व कामाचा एकूण खर्च सुमारे रु. २५ ते ३० कोटीपर्यंत येण्याचा अंदाज आहे.

११.६ श्री. ना. वि. मेराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी सदर सल्लागाराच्या कामाची व्याप्ती काय आहे अशी विचारणा केली असता प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यांनी सदर सल्लागारामार्फत सर्व्हे, भूगर्भ चाचणी, संकल्पचित्र, अभियांत्रिकी आराखडा, अंदाजपत्रक, निविदा, प्रकल्प व्यवस्थापन इ. तयार करणे तसेच कंत्राटदाराने केलेल्या कामाचे मोजमाप करुन देयकाची नोंद करणे इ. चा समावेश आहे असे सांगितले.

**निर्णय : त्यानंतर, बाब टिपण्णीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १२७३:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे M/s.XCC Engineers & Planners या संस्थेची मोनोरेलच्या नियोजित ५ स्थानकांवरील पादचारी पुल उभारण्याकामी सल्लागार म्हणून काम करण्यासाठी रु. १,२६,९९,७५०/- (सेवाकर वगळून) इतक्या रक्कमेकरीता नियुक्ती करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१२ : ठाणे - भिवंडी - कल्याण उप प्रदेशासाठी, वाहतूक मागणी अंदाजासह सार्वजनिक जलद परिवहन व्यवस्थेकरिता (MRTS) तांत्रिक - आर्थिक सुसाध्यता आणि सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी M/s. D'Appolonia S. P. A. Genova, Italy & TCE, Ltd., Mumbai (संयुक्त उपक्रम) यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करणेबाबत.**

१२.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी ठाणे, भिवंडी व कल्याण या तीन महत्वाच्या शहरांचा तसेच सभोवतालच्या परिसराचा भविष्यकालीन विकास लक्षात घेवून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ठाणे-भिवंडी-कल्याण या मार्गावरील प्रस्तावित मोनोरेल प्रकल्पाचा तांत्रिक-आर्थिक सुसाध्यता अभ्यास सल्लागारामार्फत करण्यात आल्याचे सांगितले. सल्लागाराने सदर अहवाल माहे डिसेंबर, २०११ मध्ये प्राधिकरणास सादर केला. अहवालातील शिफारशीनुसार सदर मार्गावर दैनंदिन वाहतूक संख्या (Ridership) २० वर्षाच्या अंदाजानुसार अत्यंत कमी असल्यामुळे ठाणे-भिवंडी-कल्याण मोनोरेल प्रकल्प आर्थिकदृष्टया सुसाध्य नसून प्रकल्पातून मिळणारा वित्तिय परतावा दर लक्षात घेता सदर प्रकल्प सार्वजनिक-खाजगी-सहभागातून बांधा-वापरा-हस्तांतरीत करा या तत्वावर विकसित करणे सुसाध्य दिसत नाही. तसेच या मार्गावर रस्ते आधारीत कार्यक्षम वाहतूक प्रणाली योग्य राहील जसे की, सामान्य बस सेवा/ गतिमान बस परिवहन (BRT) जी त्या मार्गास १० ते १५ वर्ष अनुकूल राहील, असे सांगितले.

१२.२ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, सदर अहवालातील शिफारशी शासनाच्या पुढील आदेशाकरीता सादर करण्यात आल्या आहेत. त्यावर दैनंदिन प्रवासी संख्या ही सर्वंकष परिवहन अभ्यास (२००५) च्या सर्वेक्षणावर आधारीत असून सदर अभ्यासास जवळजवळ १० वर्ष पूर्ण झाली आहेत. तसेच या परिसराचा झपाटयाने झालेला विकास लक्षात घेता आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास कल्याण आणि भिवंडी परिसरातील अनुक्रमे २७ व ५१ गावांकरीता विशेष नियोजन प्राधिकरण (SPA) म्हणून घोषित करण्यात आले असून त्यांनी अलिकडेच सदर भागाचा विकास आराखडा (DP) तयार केला आहे. वरील बाबी लक्षात घेता ठाणे-भिवंडी व कल्याण परिसरातील व सभोवतालच्या क्षेत्रात वेगाने होणाऱ्या विकास क्षमतेचा अभ्यास करुन, आरेखनात (Alignment) बदल करावे किंवा कसे तसेच सर्व तंत्रज्ञानाचा विचार करून कार्यक्षम वाहतूक प्रणालीच्या निवडीबाबतचा अभ्यास करून सुधारीत अहवाल सादर करावा असे निर्देश शासनाने प्राधिकरणास दिले. त्यास अनुसरुन, सल्लागाराकडून विनंती प्रस्ताव पाठविण्याकरीता दिनांक १४ ऑगस्ट, २०१४ रोजीच्या वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसारीत करण्यात आली आणि सदर जाहिरातीच्या अनुषंगाने दिनांक २५ ऑगस्ट, २०१४ पर्यंत १० सल्लागारांचे प्रस्ताव प्राप्त झाले. प्राप्त झालेल्या प्रस्तावांची सविस्तर छाननी करण्यात आली. विनंती प्रस्तावाच्या खंड क्र. ५ अन्वये जो सल्लागार संयुक्तीक तांत्रिक व वित्तीय निकषात जास्त गुण संपादन करेल, त्या सल्लागारास प्रकल्पासाठी सल्लागार म्हणुन नेमण्यात येईल. M/s. D'Appolonia SPA Genova, Italy & TCE Ltd. Mumbai (संयुक्त उपक्रम) यांचे संयुक्त तांत्रिक व वित्तीय निकषात जास्त गुण असल्यामुळे. M/s. D'Appolonia SPA Genova, Italy & TCE Ltd. Mumbai (संयुक्त उपक्रम) यांची नेमणूक करण्याची शिफारस मुल्यमापन समितीने केली. त्यास अनुसरुन M/s. D'Appolonia SPA Genova, Italy & TCE Ltd. Mumbai (संयुक्त उपक्रम) यांची रु. १,१९,८०,०००/- + सेवाकर इतक्या शुल्कावर सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यासाठी बाब टिप्पणी कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे.

**<u>निर्णय :</u>** **<u>त्यानंतर, बाब टिपण्णीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-</u>**

**<u>ठराव क्र. १२७४:</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती यांव्दारे ठाणे - भिवंडी - कल्याण उप प्रदेशासाठी, वाहतूक मागणी अंदाजासह सार्वजनिक जलद परिवहन व्यवस्थेकरीता

(MRTS) तांत्रिक - आर्थिक सुसाध्यता आणि सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी M/s. D'Appolonia SPA Genova, Italy & TCE Ltd. Mumbai यांच्या संयुक्त उपक्रमास रु.१,१९,८०,०००/- + सेवा कर ( रु. एक कोटी एकोणीस लाख ऐंशी हजार मात्र + सेवा कर) इतक्या शुल्कावर नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की**, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१३ : नवघर ते चिरनेर या प्रस्तावित बहुउद्देशिय वाहतूक मार्गाकरिता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागाराची निवड करणे.**

१३.१ महानगर आयुक्त यांनी सदर प्रकल्पाची माहिती देतांना असे सांगितले की, विरार ते अलिबाग (१२६ कि.मी) लांबीच्या बहुउद्देशिय वाहतूक मार्गिका ही राष्ट्रीय महामार्ग-८ भिवंडी बायपास, राष्ट्रीय महामार्ग-३, राष्ट्रीय महामार्ग-४ व राष्ट्रीय महामार्ग-४ब, मुंबई-पुणे एक्सप्रेस वे, राष्ट्रीय महामार्ग-१७ इत्यादी या प्रमुख मार्गांना जोडणार आहे. बहुउद्देशिय वाहतूक मार्गिका हे मुंबई महानगर प्रदेशाच्या एकूण ७ विकास केंद्र (विरार, भिवंडी, कल्याण, डोंबिवली ,पनवेल, उरण आणि तळोजा एमआयडीसी इ.) आर्थिक बळकटीकरणाच्या व रोजगार वाढविण्याच्या दृष्टिकोनातून एक महत्वाचे पाऊल ठरेल. तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, जे.एन.पी.टी. बंदर, मुंबई पारबंदर प्रकल्प व डेडीकेटेड फ्लाईट कॉरीडॉर (DFC) यांच्या विकासासाठी उपयोगी पडणार आहे. त्यामुळे जवाहरलाल नेहरु बंदराकडून सदर मार्गाकडे जाणारी वाहतूक नवी मुंबई व ठाणे या शहराबाहेरुन जाईल व सदर शहरांतर्गत होणारी वाहतूक कोंडी टळेल. तसेच विरार ते अलिबागसाठी लागणारा प्रवासाचा अवधी साधारणतः निम्म्याहून कमी होईल. सदर ७९ कि.मी. लांबीच्या प्रकल्पासाठी एकूण अंदाजित खर्च रु. १०,००० कोटी (फक्त रस्ते बांधणेकरीता) व प्रकल्पाची अंमलबजावणी सार्वजनीक, खाजगी सहभाग (PPP) या तत्वावर प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ६ मार्च,२०१२ रोजी झालेल्या १३० व्या बैठकीत मान्यता देण्यात आली असुन चिरनेर ते अलिबाग पर्यंतची उर्वरित ४७ कि.मी. लांबीच्या मार्गासाठी भविष्यात त्यावेळच्या गरजेनुसार स्वतंत्रपणे पुन्हा अभ्यास करुन त्याबद्दल आर्थिक सुसाध्यता पाहून, निर्णय घेऊन प्रस्तावित करण्यात येईल. मेट्रो छन्नमार्ग (कॉरीडॉर), सन २०२५ नंतर सुसाध्य होण्याची शक्यता आहे. सदर नवघर ते चिरनेर या प्रस्तावित बहुउद्देशिय वाहतूक मार्गाकरिता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागार निवडण्याकरिता महानगर आयुक्तांनी प्रशासकीय मान्यता

दिनांक १४ ऑगस्ट, २०१४ रोजी दिली आहे. प्रस्तावित काम पूर्ण करण्यासाठी कालावधी १२ महिने व कामाची अंदाजित किंमत रु.८ कोटी आहे.

१३.२ महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, दिनांक २१ ऑगस्ट, २०१४ रोजी सदर कामाच्या ई-निविदा मागविण्यात आल्या. विषयांकित कामासाठी ४ कंपन्यांनी निविदासंच खरेदी केले असून चारही कंपन्यांनी ई-निविदा दिनांक १८.११.२०१४ रोजी सादर केल्या. सदर ई-निविदांचे लिफाफे (तांत्रिक देकार) दिनांक २१.११.२०१४ रोजी उघडण्यात आले असून मुल्यमापन समितीने दिनांक १२.१२.२०१४ रोजी तांत्रिक तपासणी पूर्ण केली. चारही कंपन्या तांत्रिकदृष्टया पात्र झाल्या असून सदर पात्र कंपन्यांचे आर्थिक देकार दिनांक १५.१२.२०१४ रोजी उघडण्यात आले. सदर पात्र कंपनींच्या आर्थिक देकारांचा तुलनात्मक तक्ता पुढील प्रमाणे आहे :-

| अ.क्र. | कंपनीचे नाव | तांत्रिक गुण | आर्थिक गुण | एकूण गुण | निविदा देकार रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मे. आयशा | ७४.२८ | ११.८० | ८६.०१ | ७,६१,७४,३३३ | द्वितीय |
| **२.** | **मे.एगिस इंडिया कन्सल्टिंग इंजिनिअर प्रा.लि.** | **७४.८०** | **२०.००** | **९४.८०** | **४,४९,४१,७४२** | **प्रथम** |
| ३. | मे. लुईस बर्जर ग्रुप इनकार्पोरेट | ७४.८७ | ६.७० | ८१.५७ | १३,४२,४७,३०३ | चतुर्थ |
| ४. | मे. सिस्ट्रा एम.व्ही.ए | ७३.८० | ८.५३ | ८२.३३ | १०,५३,३४,९५७ | तृतीय |

१३.५ महानगर आयुक्त यांनी असेही नमूद केले की, तुलनात्मक तक्त्यानुसार मे. एगिस इंडिया कन्सल्टिंग इंजिनिअर प्रा.लि. यांची निविदा, देकार रक्कम रु.४,४९,४१,७४२/- प्राप्त झाली असून ती लघुत्तम आहे. तथापि, अंदाजित रक्कमेपेक्षा लघुत्तम दराची निविदा प्राप्त झाल्यामुळे मे. एगिस इंडिया कन्सल्टिंग इंजिनिअर प्रा.लि. यांना दिनांक १५.१२.२०१४ रोजीच्या पत्रान्वये स्पष्टीकरण सादर करण्यास कळविले त्यानुसार, मे.एगिस इंडिया कन्सल्टिंग इंजिनिअर प्रा.लि. यांनी दिनांक १६.१२.२०१४ रोजीच्या पत्रान्वये स्पष्टीकरण सादर केले. सल्लागार मे. एगिस इंडिया कन्सल्टिंग इंजिनिअर प्रा.लि. यांनी अशा प्रकारची कामे भारतात तसेच परदेशात केल्याचा पुर्वानुभव आहे. उदा. महाराष्ट्रातील औरंगाबाद येथे भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण क्र.४ ब पॅकेज-७, चेन्नई, मेट्रो लाईन- १ व २ तसेच परदेशात मॉन्टपिलर मेट्रो (फहान्स) ,मकाउ लाईट रेल (चीन) इ. कामे यशस्वीरीत्या केलेली आहेत.

सल्लागाराकडे पुर्वानुभव असलेला कर्मचारी असुन प्रस्तावित काम करण्यासाठी ते सक्षम आहेत. सल्लागाराने सादर केलेले स्पष्टीकरण वाजवी असल्याचे निदर्शनास आले.

१३.६ मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी सुचना केली की, महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी एकत्र येऊन "नवी मुंबई एअरपोर्ट इन्फ्लुएन्स नोटीफाईड एरिया (NAINA)" भागातील भूसंपादनातील समस्यांवर मार्ग काढावा.

**<u>निर्णय : त्यानंतर, बाब टिपणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी सिमितीने पुढील ठराव मंजुर केलाः-</u>**

**<u>ठराव क्र. १२७५:</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे नवघर ते चिरनेर या प्रस्तावित बहुउद्देशिय वाहतुक मार्गाकरिता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागाराची निवड करणे या कामासाठी मे.एगिस इंडिया कन्सल्टिंग इंजिनिअर प्रा.लि. यांची रु.४,४९,४१,७४२/- (रुपये चार कोटी ऐकोणपन्नास लाख एकेचाळीस हजार सातशे बेचाळीस फक्त) रक्कम किंमतीच्या लघुत्तम निविदेस मन्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की**, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.१४ अ : दिनांक ३० जून, २०१४ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे प्राधिकरणाचे लेखे.</u>**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० जून, २०१४ रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली.

**<u>निर्णय : प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.</u>**

**बाब क्र.१४ ब :** **दिनांक ३० सप्टेंबर, २०१४ रोजी संपणा-या त्रैमासिक कालावधीचे प्राधिकरणाचे लेखे.**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० सप्टेंबर, २०१४ रोजी संपणा-या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली.

**निर्णय :** **प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.**

त्यानंतर, मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी पुढील बैठकीत कामांचा भौतिक प्रगती अहवाल सादर करण्याच्या सुचना दिल्या.

**बाब क्र.१५ :** **मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी : सहामाही व्यवस्थापन अहवाल - दिनांक ०१ एप्रिल, २०१४ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१४**

मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधीच्या दिनांक ०१ एप्रिल, २०१४ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१४ चा सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**निर्णय :** **सदरहू सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र.१६ :** **प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल - दिनांक ०१ जुलै, २०१४ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१४**

१६.१ महानगर आयुक्त यांनी दिनांक ०१ जुलै, २०१४ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ हया कालावधीत प्राधिकरणाने शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार विविध बँका / वित्तीय संस्था यांमध्ये केलेल्या गुंतवणूकीची माहिती समितीपुढे सादर केली असता श्री. द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी एकाच (३ डिसेंबर, २०१४ रोजी) दिवशी गुंतविलेल्या ठेवींच्या व्याजदरामधील तफावत निदर्शनास आणून दिली. त्यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण शासनाच्या गुंतवणूकीच्या संदर्भात असलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार व कार्यकारी समितीने ठरवून दिलेल्या धोरणाप्रमाणे वित्तीय संस्था, राष्ट्रीयकृत बँका व खाजगी बँकामध्ये गुंतवणूक करीत असते. तथापि वित्तीय संस्थांकडे गुंतवणूक करण्याची कमाल मर्यादा असल्यामुळे त्यापुढचा निधी राष्ट्रीयकृत बँक यांच्यामध्ये कमी दरावर गुंतविण्यात आल्यामुळे सदरहू व्याजदरामध्ये तफावत दिसून येते.

**निर्णय :** **सदरहू गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**<u>बाब क्र.१७ :</u>** **<u>शिळफाटा - महापे रस्त्यावर एल.ॲण्ड.टी. जंक्शन येथे चौपदरी उड्डाणपूल व सेवा रस्त्यासहीत उर्वरीत रस्त्याचे रुंदीकरण व मजबूतीकरण करणे.</u>**

१७.१ महानगर आयुक्त यांनी प्रस्तावाबाबत माहिती देताना असे सांगितले की, शिळफाटा-महापे रस्त्याच्या (राज्य महामार्ग क्र.४०) उर्वरीत भागातील कामे रु.६९.०० कोटींसाठी प्राधिकरणाच्या प्रशासकीय पातळीवर मंजुर आहेत. हया कामांतर्गत एल.ॲण्ड.टी. जंक्शन येथे ४० मीटर लांबीचा मुख्य पूल व (१८०+२२०) ४०० मीटर लांबीचे दोन पोचमार्ग असा एकूण ४४० मीटर लांबीचा उड्डाणपूल प्रस्तावित आहे व मुख्य रस्त्यावर १ किलोमीटर लांबीचे ३+३ पदरी कॉंक्रीटीकरण आणि सुमारे ६.५० किलोमीटर लांबीचे दोन्ही बाजूंस सेवा रस्ते आहेत. सदरील कामाची निविदा मागविण्यात आली होती. एकूण चार निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांचा आर्थिक देकार दिनांक ०६ जानेवारी, २०१५ रोजी उघडण्यात आला. चारही निविदा व लघुत्तम देकार खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | प्राप्त देकार | नमूद देकारानुसार रक्कम (रु) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | मे. अजवानी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. | १०.४५ % कमी | ४९,४९,९९,९९९.०० | चतुर्थ लघुत्तम |
| २. | मे. जे. कुमार इन्फ्रा प्रोजेक्टस प्रा. लि. | ११.६५ % कमी | ४९,३३,०३,३८६.५० | तृतिय लघुत्तम |
| ३. | मे. एन. ए. कंन्स्ट्रक्शन प्रा. लि. | १४.९४ % कमी | ४७,४९,६५,६५२.८३ | प्रथम लघुत्तम |
| ४. | मे. रेलकॉन इन्फ्रा प्रोजेक्टस प्रा. लि. | १२.०४ % कमी | ४९,११,४५,५३८.७२ | द्वितिय लघुत्तम |

१७.२ मे. एन. ए. कंन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांची निविदा ही सर्वात लघुत्तम असल्याने व कामाच्या अंदाजित किंमतीपेक्षा कमी असल्यामुळे सदर निविदाकाराकडून याबाबतचा खुलासा मागविण्यात आला. मे. एन.ए. कंन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांनी त्यांच्या दिनांक ६ जानेवारी, २०१५ च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे खुलासा केला आहे.

अ) मे. एन. ए. कंन्स्ट्रक्शन प्रा. लि. ही प्रायव्हेट लिमिटेड कंपनी असून त्यांच्याकडे स्वतःच्या मालकीची रस्त्याच्या कामाला उपयुक्त ठरणारी सर्व प्रकारची यंत्रसामुग्री उपलब्ध आहे.

ब) सद्यःस्थितीत मे. एन. ए. कंन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांनी बदलापूर येथील प्रकल्पाचे काम पूर्ण केलेले आहे व त्या कामावरून मोकळी झालेली यंत्रसामुग्री व तांत्रिकी अधिकारी / कर्मचारी सदर नवीन प्रकल्पासाठी उपलब्ध आहेत.

..३३/-

क) मे. एन. ए. कंन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांच्या स्वतःच्या मालकीचा कॉंक्रीट व अस्फाल्ट प्लान्ट सदर कामाच्या जवळ असल्यामुळे नव्याने त्याची स्वतंत्रपणे उभारणी करण्याची आवश्यकता नाही.

उपरोक्त सदर बाबींचा विचार करता मे. एन. ए. कंन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांनी सादर केलेल्या लघुत्तम दराने, हे काम करणे शक्य आहे.

१७.३ श्री. द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी सदर कामाच्या कालावधीबाबत विचारणा केली असता, श्री.स.भ.तामसेकर, मुख्य अभियंता, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांनी या संदर्भात १८ महिने (पावसाळा धरुन) इतका कामाचा कालावधी आहे असे सांगितले.

**निर्णय : चर्चेअंती, बाब टिपणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजुर केला :-**

**ठराव क्र. १२७६:**

“**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, कार्यकारी समिती याद्वारे विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत - शिळफाटा-महापे रस्त्यावर एल.ॲण्ड.टी. जंक्शन येथे चौपदरी उड्डाणपूल व सेवा रस्त्यासहीत उर्वरीत रस्त्याचे रुंदीकरण व मजबुतीकरण करणे या प्रस्तावित कामासाठी मे. एन. ए. कंन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांची रू.४७,४९,६५,६५२.८३ (रुपये सत्तेचाळीस कोटी एकोणपन्नास लाख पासष्ट हजार सहाशे बावन्न व त्र्याऐंशी पैसे फक्त) ची लघुत्तम निविदा (अंदाजपत्रकीय किंमतीपेक्षा म्हणजेच रु.५५.८४ कोटी पेक्षा १४.९४% कमी दराने) स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

“**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**<u>बाब क्र.१८ :</u>** **<u>ठाणे-बेलापूर रस्त्यावरील सविता केमिकल्स जंक्शन, घणसोली नाका व तळवली नाका येथे उड्डाणपूल आणि महापे जंक्शन येथे भुयारी वाहन मार्गाचे बांधकाम - - लघुत्तम निविदेस मान्यता.</u>**

१८.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने लोकप्रतिनिधींकडून करण्यात आलेल्या मागणीनुसार प्राधिकरण क्षेत्रातील प्रादेशिकदृष्टया महत्व असलेली कामे हाती घेण्याचे ठरविले होते व अशा कामांना प्राधिकरणाच्या दिनांक २७ जून, २०१४ रोजी झालेल्या १३४व्या बैठकीत प्रशासकीय मंजूरी देण्यात आली. सदर कामामध्ये ठाणे बेलापूर रस्त्यावरील सविता केमिकल्स जंक्शन, घणसोली नाका व तळवली नाका, येथे उड्डाणपूल आणि महापे जंक्शन येथे भुयारी वाहन मार्ग बांधणे या कामाचा अंतर्भाव होता व त्यासाठी रु.१५३.३१ कोटी इतकी प्रशासकिय मंजुरी देण्यात आली होती. सदर कामाच्या अंमलबजावणीमुळे अस्तित्वात असलेल्या ठाणे-बेलापूर या अतिशय महत्वाच्या रस्त्यावरील सद्यस्थितीत होणारी वाहतूकीची कोंडी सोडविण्यास मदत होईल.

१८.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, सदर प्रकल्पामध्ये घणसोली नाका व तळवली नाका हे दोन्ही जंक्शन पार करणा-या उड्डाणपूलाचे बांधकाम करावयाचे असून या उड्डाणपूलाची एकूण लांबी १.४ कि.मी. इतकी आहे. प्रस्तावित उड्डाणपूल चार मार्गिकांचा (२ + २) आहे. तसेच या प्रकल्पात सविता केमिकल्स जंक्शन येथील ठाणे कडून बेलापूरकडे जाण्यासाठी दोन मार्गीका असलेल्या ६०० मीटर लांबीच्या उड्डाणपूलाचाही अंतर्भाव आहे. त्याचबरोबर महापे जंक्शन येथे ठाणेकडून बेलापूरकडे जाण्यासाठी तीन मार्गीका असलेला ५०० मीटर लांबीच्या भुयारी वाहन मार्गाचाही या प्रकल्पात अंतर्भाव आहे.

१८.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, या प्रकल्पाकरिता वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन ठोक रक्कम पध्दतीवर (Lump sum basis) ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार चार (४) निविदाकारांनी त्यांच्या ई-निविदा सादर केल्या. त्यातील प्राप्त झालेला लघुत्तम देकार हा अंदाजित रक्कमेपेक्षा २६.१७% इतका जास्त दिसून आला. त्यावर सल्लागारांच्या अभिप्रायानुसार सदर कामाचे अंदाजपत्रक जे की, नवी मुंबई महानगरपालिकेकरीता तयार करण्यात आले होते, ते सन २०११-२०१२च्या जिल्हा दर सुचीनुसार होते. तसेच सदर कामासाठी तयार करण्यात आलेले कामाचे अंदाजपत्रक हे गर्डर पध्दतीच्या बांधकामाचे होते. परंतू पुलाच्या बांधकामासाठी कमी जागा लागावी हे लक्षात घेऊन व पूल हा सुबक दिसावा हया दृष्टीकोनातून पुलाचे बांधकाम ‘‘सेगमेंटल कंन्स्ट्रक्शन’’ पध्दतीचे मानुन पुलाच्या कामासाठी निविदा मागविण्यात आल्या. सदर कारणास्तव सल्लागारांनी यावर्षीच्या प्रचलित दरसूचीनुसार व ‘‘सेगमेंटल कंन्स्ट्रक्शन’’ प्रमाणे पुलाचे बांधकाम धरुन त्यानुसार

अंदाजपत्रक परिगणित केले. त्यानुसार पुलाची अंदाजित किंमत ही रु.१५४.११ कोटी इतकी झाली. दरम्यान कंत्राटदारास त्याने दिलेल्या खुलाशाव्यतिरीक्त वाटाघाटी करण्यासाठी पाचारण करण्यात आले होते. सदर वाटाघाटी दरम्यान कंत्राटदाराने प्रस्तावित काम रु.१५५ कोटी इतक्या रक्कमेत पूर्ण करण्याचे मान्य केले व तसे पत्र दिले. त्यामुळे कंत्राटदाराकडून प्राप्त झालेला दर हा कामाच्या सध्याच्या दरसूचीनुसार परिगणित करण्यात आलेली किंमत (रु.१५४.११ कोटी) यापेक्षा ०.५८% अधिक असल्याने त्यास मान्यता देण्याची शिफारस कार्यकारी समितीस करण्यात आली.

१८.४ ई टेंडरिंगमधील संभाव्य अनियमितता / गैरप्रकार टाळण्याच्या दृष्टीने, बृहन्मुंबई महानगर पालिकेतील ई टेंडरिंग मधील अनियमितता / गैरप्रकाराची माहिती अन्य संस्थांना वितरीत करण्यात यावी.

**<u>निर्णय :</u>** **<u>त्यानंतर, बाब टिप्पणीमधील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजुर केला :-</u>**

**<u>ठराव क्र. १२७७:</u>**

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत ठाणे-बेलापूर रस्त्यावरील सविता केमिकल्स जंक्शन, घणसोली नाका व तळवली नाका येथे उड्डाणपूल आणि महापे जंक्शन येथे भुयारी वाहन मार्ग बांधणे हया कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांची वाटाघाटी प्रमाणे रु.१५५ कोटी किंमतीची लघुत्तम देकार असलेली व तसेच प्रचलित दरसूचीवर आधारीत किंमतीवर ०.५८% एवढा अधिक असलेली निविदा स्विकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**“असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही योग्य त्या फेरबदलांसह करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**<u>बाब क्र.१९ :</u>** **<u>प्राधिकरणाच्या आस्थापनेवर अधिसंख्य अतिरिक्त महानगर आयुक्त या दर्जाचे एक पद निर्माण करणेबाबत.</u>**

१९.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मेट्रो रेल्वे या महत्वाकांक्षी प्रकल्पाचे कार्यान्वयन योग्यप्रकारे होण्याच्या दृष्टीने राज्यशासन व केंद्र शासनाच्या मंजूरीने मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनची स्थापना केली असून आता शासनाच्या

सामान्य प्रशासन विभागाने श्रीमती अश्विनी भिडे, भा.प्र.से. सचिव, शालेय व क्रिडा विभाग यांची व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन या रिक्त पदावर पूर्णवेळ पदस्थापना केली आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या नियामक मंडळाची रचना करताना प्राधिकरण आणि कॉर्पोरेशनमध्ये कायमचे संबंध राहावे या उद्देशाने प्राधिकरणाचे अतिरिक्त महानगर आयुक्त हे सदर कॉर्पोरेशनचे पदसिध्द (Ex-Officio) संचालक आणि व्यवस्थापकीय संचालक ही दोन्ही पदे एकाच अधिकाऱ्याकडे ठेवण्याचे ठरविण्यात आले होते. आता व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन या पदावर शासनाच्या आदेशानुसार श्रीमती अश्विनी भिडे, भा.प्र.से. यांना रुजू करुन घेणे आवश्यक असल्यामुळे त्यांना रुजू करुन घेण्यात आले आहे. परंतू, त्यांच्याकरीता अतिरिक्त महानगर आयुक्त दर्जाचे एक पद निर्माण करणे आवश्यक आहे.

१९.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ मधील कलम ११चे उपकलम (१-ब) नुसार प्राधिकरणास आवश्यक असलेल्या भारतीय प्रशासनिक सेवेतील एक किंवा अधिक उप किंवा सहायक महानगर आयुक्त, अतिरिक्त महानगर आयुक्त यांची आवश्यकतेनुसार पदस्थापना करण्यास कार्यकारी समिती राज्य शासनास विनंती करेल, अशी तरतूद आहे. राज्य शासन आदेशाद्वारे वेळोवेळी अतिरिक्त महानगर आयुक्त, सह महानगर आयुक्त व सहाय्यक महानगर आयुक्त यांचे वेतन आणि त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती ठरवील. शासनाच्या नगर विकास विभागानेही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामध्ये अधिकचे पद निर्माण करणे आवश्यक असल्यास प्राधिकरणाने त्यास कार्यकारी समितीची अथवा योग्य प्राधिकरणाची कार्योत्तर मान्यता घ्यावी, असे निदेश दिले आहेत. त्यानुसार प्राधिकरणास अतिरिक्त महानगर आयुक्त या दर्जाचे आणखी एक पद निर्माण करणे आवश्यक असल्यामुळे राज्य शासनास सदर पद निर्माण करण्याच्यादृष्टीने व त्यासंबंधीचे आदेश निर्गमित करण्यासाठी अधिनियमातील तरतूदीनुसार शिफारस करण्याकरीता बाब टिप्पणी कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे.

**निर्णय : त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १२७८:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०३ जानेवारी, २०१५ रोजीच्या आदेशानुसार श्रीमती अश्विनी भिडे, भा.प्र.से. यांना व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन या पदावर पदस्थापना करण्याच्या दृष्टीने मुंबई महानगर प्रदेश विकास

प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ११चे उपकलम (१-ब) मधील तरतूदीनुसार प्राधिकरणामध्ये अतिरिक्त महानगर आयुक्त या दर्जाचे एक पद दिनांक ०५ जानेवारी, २०१५ पासून निर्माण करण्यास व त्या अनुषंगाने आदेश निर्गमित करण्याच्या दृष्टीने राज्य शासनास प्रस्ताव सादर करण्यास याव्दारे मंजूरी देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** कार्यवृत्त मंजूरीची वाट न पहाता वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.२० : श्री. उमेश लुकतुके, तत्कालीन प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग यांच्या विरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करणेबाबत.**

२०.१ या विषयासंबंधी माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, श्री. उमेश लुकतुके यांची प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग या पदावर कार्यकारी समितीने त्यांच्या ठराव क्र.९२१ अन्वये नेमणूक केली होती. श्री. लुकतुके हे नियत वयोमानानुसार दिनांक ३०.०९.२०१० रोजी प्राधिकरणाच्या सेवेतून निवृत्त झालेले आहेत. शासनाच्या नगर विकास विभागाने असे कळविले आहे की, आदर्श सहकारी गृहनिर्माण संस्था, कुलाबा बाबत नेमण्यात आलेल्या व्दिसदस्यीय चौकशी आयोगाच्या अहवालावरील कार्यवाहीबाबत दर दोन महिन्यांनी मा.मुख्य सचिव यांना अवगत करणे आवश्यक आहे. उक्त चौकशी आयोगाच्या अहवालाचे अवलोकन केले असता आयोगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील संबंधीत श्री.उमेश लुकतुके, तत्कालीन प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना वर्तणूक नियमाचा भंग केल्याच्या कारणास्तव प्रथम दर्शनी दोषी ठरविले आहे. शासनाच्या पत्रानुसार प्राधिकरणाने श्री. लुकतुके यांचे विरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही सुरु करण्यात येत असल्याचे शासनास कळविण्यात आले आहे.

२०.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, प्राधिकरणातील विभाग प्रमुखांच्या नेमणूकीचे अधिकार कार्यकारी समितीस आहेत. श्री. उमेश लुकतुके, तत्कालीन प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग यांची प्रमुख पदावर नेमणूक कार्यकारी समितीने केलेली असल्याने त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्याचे अधिकार कार्यकारी समितीस आहेत.

२०.३ शासनाच्या आदेशानुसार श्री. उमेश लुकतुके, तत्कालीन प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग यांचे विरुध्द विभागीय चौकशी करण्याचे प्रस्तावित असून श्री. व्ही. डब्ल्यु. देशपांडे, माजी संचालक, नगर

रचना, महाराष्ट्र शासन यांची चौकशी अधिकारी व श्री. पी. एम. यादव, वरिष्ठ नियोजक, नगर व क्षेत्र नियोजन विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची सादरकर्ता अधिकारी म्हणून नेमणूक करण्याचे प्रस्तावित आहे.

**निर्णय :** **त्यानंतर, बाब टिपण्णीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला.**

**ठराव क्र. १२७९ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४चे कलम ७ चे उपकलम ३ चे पोटकलम (एक) च्या अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे श्री. उमेश लुकतुके, तत्कालीन प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग यांचे विरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यास मान्यता देत असून श्री. व्ही. डब्ल्यु. देशपांडे, माजी संचालक, नगर रचना, महाराष्ट्र शासन यांची 'चौकशी अधिकारी' म्हणून नेमणूक करण्यास व श्री. पी. एम. यादव, वरिष्ठ नियोजक, नगर व क्षेत्र नियोजन विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांची 'सादरकर्ता अधिकारी' म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देत आहे."

**बाब क्र.२१ : काळू पाणी पुरवठा प्रकल्पातील धरण बांधकामाची सद्यःस्थिती अहवाल आणि प्रकल्प राबविण्याबाबत मार्गदर्शन मिळणेसाठी सादर.**

२१.१ महानगर आयुक्तांनी काळू पाणी पुरवठा प्रकल्पाच्या सद्यःस्थिती बाबत माहिती देताना असे सांगितले की, कोंकण पाटबंधारे विकास महामंडळाने काळू प्रकल्पाचे सुरु केलेले धरण बांधकाम मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दिनांक ०२.०३.२०१२ पासून स्थगित आहे. मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाने धरण बांधकामासाठी आतापर्यंत एकूण रु. ११४.२८ कोटी इतका निधी दिलेला आहे. प्रकल्पातील भूसंपादन व पुनर्वसन ही कामे बाकी आहेत. वन जमीनीची एन.पी.व्ही. ची रक्कम रुपये २०३.३३ कोटी तसेच धरण बांधकामातील उर्वरित देयके रु.६५.५५ कोटींची मागणी कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ करत आहे. मा. मुख्य सचिव यांच्या स्तरावर काळू प्रकल्पातील विविध बाबींवर चर्चा करण्यासाठी बैठका घेण्यात आल्या त्यातील दिनांक १९.०६.२०१४ रोजी झालेल्या बैठकीत धरण बांधकामाच्या उर्वरित देयकांच्या बाबतींत प्राधिकरणाने त्यातील तांत्रिक बाबी तपासून त्यानुसार कार्यवाही करावी असा निर्णय घेण्यात आला. प्राधिकरणातर्फे त्यानुसार सल्लागार नेमून झालेल्या कामाची तपासणी करण्यात आली व अहवाल मागविला. सदर अहवालानुसार झालेल्या कामाची किंमत कोंकण पाटबंधारे विकास महामंडळाकडून

..३९/-

मागणी केलेल्या रक्कमेपेक्षा फार कमी आहे. त्या अहवालाची प्रत कोंकण पाटबंधारे विकास महामंडळास अग्रेसर केली असून त्यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत ते अद्याप प्राप्त होणे बाकी आहे. प्रकल्पातील वरील सादर केलेली कामाची सद्य:स्थितीवर चर्चा करून कार्यकारी समितीचे मार्गदर्शन मिळण्यासाठी ही टिप्पणी सादर करत असल्याचे महानगर आयुक्त यांनी नमूद केले.

२१.२ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे निर्देश दिले की, सल्लागाराच्या अहवालाबाबत कोंकण पाटबंधारे विकास महामंडळाकडून अभिप्राय प्राप्त करुन घ्यावेत. त्याचप्रमाणे त्या अभिप्रायातील तांत्रिक मुद्दे अन्य तज्ञांकडून तपासून घ्यावेत व त्यानुसार प्रस्ताव सादर करावा, तोपर्यंत कोंकण पाटबंधारे विकास महामंडळास कोणताही निधी अदा करू नये.

त्यानंतर, मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

----------xox----------